नेहरू बाल पुस्तकालय

# पक्षी जगत

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. 93266



IRBK-0113266

JPIrani

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ग्र.क्र. ९३२६६

नेहरू बाल पुस्तकालय - 4 MAY

06365
30/3/09
3433

# पक्षी जगत

लेखिका
**जमाल आरा**

चित्रकार
**जे. पी. इराणी**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम 06365 दि
क्रमांक 3433 नोंद दि 30/3/09

म. [illegible], वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. 93266 नों. दि
वि. [illegible] क.

डेया

IRBK-0113266

नोव्हेंबर १९७० (अग्रहायण १८९२)

© जमाल आरा, १९७०

मूल्य रु. १·५०

WATCHING BIRDS (*Marathi*)

*Translated by*

Raja Mangalwedhekar

प्रकाशक : सेक्रेटरी, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए–५, ग्रीन पार्क, नवी दिल्ली–१६,
मुद्रण : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४,
मुखपृष्ठ व छायाचित्रे–इंद्रप्रस्थ प्रेस, (सी. बी. टी.), नेहरू हाऊस, ४, बहादूरशाह
जाफर मार्ग, नवी दिल्ली–१.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ... नि ...
क्रमांक ...... प्रस्तावना नोंद दि. ...

असे म्हणतात की, मुलांसाठी निर्माण केलेल्या पुस्तकांवरून त्या देशाच्या विकासाचे मूल्यमापन करता येते. भारत स्वतंत्र झाल्यापासून आपण जरी बरीच प्रगती केलेली असली तरी या मोजपट्टीने मोजल्यास, मला असे भय वाटते की, आपण निश्चितच मागासलेले ठरू. सरकार या बाबतीत अत्यंत जागरूक आहे. देशाच्या शैक्षणिक गरजांबाबत सल्ला देण्यासाठी नुकतेच एक मंडळ नियुक्त केले होते. त्यावेळचे मंडळाचे निरीक्षण असे आहे, "भारतातील सगळ्या मुलांना वाचता येईल असे सर्वसाधारण पुस्तक क्वचितच असेल आणि आपल्या शिक्षणपद्धती-मधून राष्ट्रीय एकात्मतेला फार अल्प साहाय्य मिळते त्याचे हे एक कारण आहे." संसद सदस्यांची जी एक समिती शिक्षण मंत्रालयाशी आणि युवक सेवेशी संबद्ध आहे. तिनेही या शिफारशीला पाठिंबा दिला असून आपल्यापाशी भारतातील मुलां-साठी अशी पुस्तके असण्याची अत्यावश्यकता प्रतिपादिली आहे.

'नेहरू बाल पुस्तकालय' या योजनेखाली अशी पुस्तके निर्माण होत आहेत हे पाहून मला आनंद वाटतो. कारण त्यायोगे भारतीय मुलांची एक महत्वाची गरज आपण भागविणार आहोत. नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, या संस्थेने आयोजिलेल्या या पुस्तक-मालिकेत भारतातील सर्व मुलांना, सर्व महत्वाच्या भारतीय भाषांमधून प्रख्यात लेखकांनी लिहिलेली, ट्रस्टच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली सुबक रीतीने तयार झालेली, उत्तमोत्तम पुस्तके पुरवणी वाचनासाठी उपलब्ध होतील. या पुस्तकांचे एक आकर्षक वैशिष्टय हे राहील की, प्रत्येक पुस्तक एकाच वेळी महत्वाच्या सर्व भारतीय भाषांमधून प्रसिद्ध होईल. अशा रीतीने भारतातील सर्व मुलांना एकच पुस्तक वाचायला मिळेल, आणि या उपक्रमातून, मुलांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना जोपासली जाईल.

श्रीमती जमाल आरा यांनी पक्ष्यांवर लिहिलेले हे पुस्तक जर या दृष्टीने सूचक असेल तर आपल्या मुलांमध्ये ही पुस्तकमाला अत्यंत लोकप्रिय होईल अशी मला

खात्री आहे. हे पुस्तक आमच्या बालकांना पुष्कळ माहिती पुरवील, आणि ती केवळ उपयुक्त असेल येवढेच नाही, तर मुलांना उत्तेजन देणारी ठरेल. या पुस्तकाची निर्मिती देखील सुबक झालेली आहे. हे पुस्तक वाचायला मुलांना खूप गंमत वाटेल, अशी मला पूर्ण खात्री आहे.

**व्ही. के. आर. व्ही. राव**

# १. संरक्षक रंगसंगती आणि नक्कल

पक्षी कोणाला आवडत नाहीत? सुंदर आणि ऐटबाज अशा या प्राण्यांचे निरीक्षण करण्यात एक अपूर्व आनंद आहे. मजा आहे. केव्हाही पाहा, पक्षी आपल्या उदयोगात गढलेले दिसतात. इकडून तिकडे आणि तिकडून इकडे भरारी मारीत असतात. घटकेत टुणटुण चालतील, तर घटकेत चौफेर धावतील, चिवचिवाट करतील, गातील, पाण्याचे तुषार अंगावर उडवून घेतील आणि अंग साफसूफ करतील. नीटनेटके आणि स्वच्छ दिसण्यासाठी केवढी काळजी घेतील. पक्ष्यांच्या या सुंदर तऱ्हा पाहून आणि आनंददायक किलबिल ऐकूनच आपण त्यांच्यावर मोहित होतो. खरोखर, इवलेसे पंख असणारे हे आपले सोबती जर नसते तर हे जग भकास, भयाण भासले असते नाही? आणि या पंखांच्या तऱ्हा तरी किती! किती आकर्षक त्यांची रचना. पिसाऱ्याचा नाजुकपणा तर शब्दांत वर्णन करणे कठीण. आपापल्या परीने देखणे दिसणारे हे पंख पक्ष्यांना उपकारकही आहेत. झाडाझुडपांच्या आणि जमिनीच्या रंगाशी हुबेहूब मिसळून जाणारी पिसांची रंगछटा व त्यांचे आकार आश्चर्यकारक असतात. पक्ष्यांचा पिसारा ही त्यांची एक ढालच होय.

दाट झाडीत, गवताळ भागात आणि पालापाचोळ्यात राहणाऱ्या पाणलाव आणि रानकोंबडा यासारख्या पक्ष्यांचा पिसारा ठिपक्या-ठिपक्यांचा किंवा आडव्यातिडव्या रेघारेघांचा असा चित्रविचित्र असतो. तो त्या वातावरणाशी अगदी मिळताजुळता असतो. तितर आणि लाव यासारखे पक्षी शेतमळ्यातून हिंडत असतात. त्यांची पिसे तपकिरी रंगाची असतात. आणि त्यावर काळ्या रंगाचे तुषारही दिसतात. या रंगसंगतीमुळे जवळ असूनसुद्धा पक्षी ओळखणे मोठे कठीण होते.

त्याशिवाय जे पक्षी हिरव्यागार वृक्षराजीत आणि प्रखर सूर्यप्रकाशापासून दूर अशा गर्द सावलीत राहतात, त्यांचा पृष्ठभागही गर्द निळा, हिरवा, पिवळा आणि किरमिजी रंगांचा असतो. त्यांच्या पिसावरच्या जोमदार रंगीत पट्ट्यांनी शत्रूची नजर दिपविते.

लहान चिमुकल्या पक्ष्यांचे वर्णसाम्य त्यांच्याहून मोठ्या असलेल्या पक्ष्यांशी असते. कोकीळ पक्षी ससाण्यासारखा दिसतो. हे 'संरक्षक साम्या'चे उत्तम उदाहरण होय.



तांबट



पाकोळी आणि पांगोळी

## २. माणसाला पक्ष्यांची मदत

प्राणघातक जंतूंचा नाश करण्याच्या कामी पक्षी आपले प्रमुख सहायक असतात. पक्ष्यांच्या साहाय्याशिवाय जग उजाड झाले असते. आपली शेते, जंगले, उद्याने आणि फळबागा या सर्व ठिकाणी लहान-मोठ्या जंतूंच्या फौजा असतात. हिरवी रोपे, पाने, अंकूर सगळे काही हे जंतू मटकावीत असतात. एकट्या भारतातच निरनिराळ्या जंतूंच्या ३०,००० हून जास्त जाती आहेत. जंतू सदैव उपद्रव देतात असेही नाही. निसर्गाच्या राज्यात त्यांच्यावरही काही कामगिरी सोपविलेली आहेच आणि म्हणूनच पुष्कळसे जंतू उपकारक असतात.



सुतार

या प्राणघातक जंतूंच्या उत्पत्तीचा वेग अतिप्रचंड आहे. त्यामुळे त्यांची संख्या फार वाढू देता कामा नये. नाहीतर झाडाचे पान न् पान आणि गवताचे पाते न् पाते हे जंतू फस्त करून टाकतील. सृष्टीचे ओसाड वाळवंट होईल.

उडत्या जंतूंना पटकन पकडून चटकन मटकाविण्यात पाकोळी आणि पांगोळी ह्यांच्याइतके पटाईत कुणी नाही. पाकोळी हा मोठा देखणा पक्षी आहे. पाकोळीचे शेपूट निमुळते पण दुभंगलेले असते. पंख झेपावून आभाळातून भराऱ्या मारत, वळत, मुरडत, किलबिलत हिंडण्यातच तिचा बहुतेक वेळ जातो. इकडे तिकडे उडणारे जंतू खाऊनच ती पोट भरते, हवा स्वच्छ ठेवते. उडण्यात खंड न पाडताही पाणी पिण्यासाठी जलाशयाच्या पृष्ठभागावरून ती सरपटत झेपावते. तिचे पंख उडण्यासाठी जेवढे बळकट आणि चपळ असतात, तेवढे जमिनीवर किंवा फांदीवर बसण्यासाठी नसतात. इतर पक्ष्यांप्रमाणे उड्या मारणे किंवा पळणे तिला जमत नाही, कारण तिचे पायच फार नाजूक असतात. बारीक फांदीसारख्या काड्या, तारयंत्राच्या किंवा दूरध्वनीच्या तारा मात्र त्या पायांनी ती घट्ट

धरून बसते. शहरे आणि खेडी यांच्यावर न थकता भागता पांगोळी भिरभिरत राहते. अशा काही बाबतीत पांगोळीचे पाकोळीशी साम्य असले तरी दोघींत पुष्कळच फरक आहे. पाकोळीच्या पंखापेक्षा पांगोळीचे पंख पतलेदार, अरुंद, बाकदार आणि एकसारखे धुरकट रंगाचे असतात. पांगोळी सदैव हवेत तरंगते. ती क्वचितच भुईवर उतरते. हवेतले जीवजंतू आणि कीटाणू खात ती सारखी घिरट्या घालीत असते.

सुतार हा आणखी एक जंतुभक्षक पक्षी. हा पानांचे देठ आणि झाडांच्या फांद्या यावरील खोबणीतले जंतू चोचीने उकरून खातो.

पक्षी थोडक्या काळात पुष्कळशा जंतूंचा फडशा पाडत असतात. अवघ्या अर्ध्या तासात एक लहानसा पक्षी सहाशेहून अधिक सुरवंट फस्त करतो, असे आढळले आहे; तर दुसरा एखादा छोटा पक्षी तेवढ्याच काळात सुमारे तीन हजार वनस्पतींवरच्या आळ्या व उवा मटकावितो.



गरुड

चिमणाचिमणीचा जोडा अखंडपणे तासन्तास मागेपुढे भिरभिरत राहतो. हा जोडा दर मिनिटाला दोनदोनदा माघारी येऊन आपल्या पिल्लासाठी चोच भरून कीडमुंगी आणीत राहतो.

••••••

घार, गरुड, ससाणा यांसारखे शिकारी पक्षी शेतकऱ्यांना आवडत नाहीत. कारण ते त्यांच्या शेतावरील पक्षी आणि कोंबडीची पिल्ले पळवीत असतात. परंतु हे पक्षी शेतामधील पिकांची नासाडी करणाऱ्या घुशी, उंदीर, खारी यांचीसुद्धा शिकार करीत असतात. पक्ष्यांची अंडी आणि पिल्ले गिळंकृत करणारे साप आणि इतर प्राणी यांची शिकार करून शिकारी–पक्षी इतर पक्ष्यांच्या अस्तित्वाला मदतच करीत असतात. त्याचप्रमाणे साथीचे भयंकर प्राणघातक रोग फैलावून माणसाच्या जीविताला अपाय करणारे किडे हे पक्षी फस्त करून टाकतात.

गिधाडे, घारी आणि कावळे हे स्वच्छता करण्यात मोठे तत्पर व पटाईत झाडूवाले असातात. मृत प्राणी आणि घाण हे पक्षी चटकन उचलतात आणि आपले रस्ते व खेडी स्वच्छ ठेवतात. महापूर आणि



फुलटोचा


दुष्काळ या संकटकाळी हे पक्षी मोठ्या संख्येने खाली उतरतात आणि सर्वत्र मरून पडलेली जनावरे खाऊन टाकतात. विलक्षण जलदीने मृत प्राणी मटकाविण्याची गिधाडांची पद्धत फार आश्चर्यकारक आहे.

••••••

फुलांचा संयोग घडून नवीन उपज करण्यातसुद्धा पक्ष्यांचा वाटा असतो. काही जातींच्या पक्ष्यांच्या चोची आणि जिभा फुलांच्या परागातील मध टिपून घेता येईल अशाच तऱ्हेच्या असतात. फुलांवर भिरभिरताना फुलांतील सोनेरी पराग-कण पक्ष्यांच्या डोक्याला किंवा पंखांना चिकटतात. त्या फुलावरून ते दुसऱ्या फुलावर जातात त्यावेळी तेथे ते पराग-कण सांडतात. फुलांची उपज वाढण्यासाठी अशा तऱ्हेने पराग-कणांचा संयोग होण्याची फार गरज असते.

••••••

हजारो शिकारी पक्षी (लावी, तितर, इत्यादी) आणि पाणकोंबडे (बदक, पाणकोंबडा व पाणलाव) जाळ्यात पकडतात. किंवा बंदुकीने मारतात. आणि खाण्यासाठी बाजारात विकतात. हा धंदा करणाऱ्यांना दरवर्षी कितीतरी नफा होतो. पक्ष्यांचे मांस खायलाही मोठे रुचकर लागते. खरं तर आपण या चिमुकल्या पंखांच्या पक्ष्यांशी दुष्टपणाने वागतो, ते आपल्याला कसलाच त्रास देत नाहीत, उलट पुष्कळशी मदतच करीत असतात.



पाणकोंबडा

# ३. कारागीर


शिंपी


तुम्ही जर जवळून पक्ष्यांचे निरीक्षण केलेत तर त्यांच्यासंबंधी तुम्हाला कितीतरी मनोरंजक आणि अद्‌भुत गोष्टी कळतील. या झाडांवरून त्या झाडावर एकसारख्या भराऱ्या मारीत राहणारे पक्षी सदैव कामात दंग असतात. माणसांप्रमाणे पक्षीसुद्‌धा घर करतात. पिलांचे पालन-पोषण करतात. त्यांचीसुद्‌धा एक भाषा असते.

पक्ष्यांच्या दुनियेत शिंपी, सुतार, मच्छीमार असे सर्व प्रकारचे कुशल कारागीरदेखील असतात.

**शिंपी :** कोळिष्टके, 'कोसल्या'तील (रेशमी किडयांचे घरटे) रेशीम आणि तलम तंतू यांचा शिवण्यासाठी धागा म्हणून, शिंपी पक्षी वापर करतो. नंतर दोन किंवा अधिक पाने घेऊन तो कुशलतेने ती आपल्या अणुकुचीदार चोचीने शिवतो. त्यांचे झकास घरटे तयार करतो.

**सुतार :** झाडाच्या बुंध्यावरील कीडमुंगी शोधण्यासाठी सुतार आपल्या चोचीने सारखा उकरीत असतो. त्याची चोच करवतीसारखी धारदार असते. सुतार ती कुऱ्हाडीसारखी वापरतो. बुंध्याची ढलपी, झाडाची साल काढतो. खोड विंधून भोके पाडतो.

सुताराची जीभ मोठी गमतीदार असते. लांब, गोलसर आणि आकडयासारखी, किंवा अणुकुचीदार अशा कठीण आकडयाच्या शिंगासारखी.





चोचीमधून त्याला जीभ भाला फेकल्या-प्रमाणे आत-बाहेर करता येते. जिभेच्या साह्याने खणून, उकरून कीडमुंगी आणि अंडी त्याला मटकाविता येतात.

**मच्छीमार :** पक्ष्यांमध्ये पुष्कळ मच्छीमार आहेत. त्या सर्वांत देखणा असतो खंडया. खंडया भेटतो रानातील तळयाच्या काठी, शांत पुलाच्या कमानीखाली किंवा झुळझुळ वाहणाऱ्या ओढयाच्या कडेला. पाण्यावर झुकलेल्या झाडाच्या फांदीवर 'खंडया बसतो व टक लावून पाण्याकडे पाहतो. एखादी चंदेरी मासोळी सुळकन जाताना दिसली रे दिसली की खंडया पट्कन पाण्यावर झेपावतो. चटकन तो आपल्या लांबसडक चोचीत त्या मासोळीला पकडतो.

**झाडूवाले :** पक्ष्यांतील झाडूवाल्यांपैकी गिधाड हे एक मोठया शरीराचे, तुळतुळीत टकल्या डोक्याचे आणि कृश, किडकिडीत मानेचे गिधाड दिसायला आकर्षक नसते. परंतु अचूक झेप घेण्यात मात्र ते अजोड व अतुल आहे. खालचे जग धुंडाळीत ते उंच आभाळात भरारी मारीत असते. घार वगैरे आपली सगीसोयरी मंडळी घेऊन ते रस्ते न्याहाळीत राहते. खेडीपाडी व स्मशाने धुंडाळते. उकिरडयावरील फुकट गेलेले अन्न, घाण आणि मरून पडलेली जनावरे खाऊन टाकते.



कावळा



**चोर :** यात सर्वांना परिचित पक्षी म्हणजे कावळा. चकाकणारे काळे कुळकुळीत पंख आणि धूर्त नजर यामुळे कावळा मोठा आकर्षक दिसतो. तो माणसालाही ठकवील आणि जनावरालाही फसवील. त्यामुळे तो कुणालाच आवडत नाही. दुकान असो की शेत असो, जिथे कुठे दाणादुणा दिसेल, तेथे कावळेबुवा तो धिटाईने लंपास करताना दिसतील. येवढेच नव्हे पण कावळा घरट्यांतील अंडी आणि पक्ष्यांची पिलेही पळवितो.

**पोलीस शिपाई :** कोतवाल हा पक्ष्यांतील पोलीसच आहे. चकचकीत काळा पिसारा म्हणजे याचा गणवेष. कोतवाल काय करतो, तर गावाभोवती पहारा ठेवतो. टेहळणी करतो, येवढेच काय पण आपल्यापेक्षा दांडग्या पक्ष्यांवरही हल्ला चढविण्यास तो कचरत नाही. भित्रे पक्षी कोतवालाजवळ आपली घरटी मुद्दाम बांधतात. कारण कोतवालसाहेब केवळ आपलेच घरटे राखत नाहीत तर शेजाऱ्यांचीही घरटी राखतात. ते अंडी पळविणाऱ्या कावळ्यावर डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवतात. पूर्व दिशेला तांबडे फुटले की, कोतवाल जागा होतो. लवकर उठणारा हा पक्षी आहे. भल्या पहाटे पोहोचणारी कोतवालाची मधुर शीळ वातावरणात घुमत राहते. सूर्योदय झाल्याचा जणू तो एक संदेशच असतो.



कोतवाल

**रात्रीचा पहारेकरी :** दिवसभर झोप ताणल्यावर रात्रीच्या काळोखात घुबड उठून बसते. रात्रभर, गावावर गस्त घातल्यागत लक्ष ठेवते. घुशी शोधीत रानातून धान्याच्या कोठारातून




घुबड

आवाज न करता घुबड संथपणाने भिरभिरत राहते. घुबडाची, आकडेदार चोच आणि वळकट आत वळलेली नखे ही त्याला भक्ष्य मारण्यास उपयोगी पडतात.

**शिकारी :** गरुड आणि बहिरी ससाणा हे दिवसा–उजेडी शिकार साधणारे क्रूर शिकारी आहेत. धारदार आकडयासारखी चोच आणि दणकट नखे यांच्या साहयाने ते रानातील कितीतरी उंदीर आणि खारी यांचा लीलया फडशा पाडीत असतात. शेतातील पिकांना उपद्रव देणाऱ्या उंदीर, खारीप्रमाणेच ते कितीतरी घातक कृमी कीटकांचा नाश करतात. त्यांची झेप तीव्र आणि वेगवान असते.

**आळशी :** कोकिळेचे "कुहूकुहू" तुम्हा सर्वांच्या परिचयाचे आहे. कोकिळा आळशी मात्र फार आहे. इतकी की, ती आपले घरटेसुद्‌धा बांधीत नाही. धूर्तपणाने ती आपली अंडी कावळयाच्या घरटयात घालते. कावळी ती आपली समजून उबवते, पिल्ले देखील पोसते. पिल्ले मोठी झाली म्हणजे मात्र ती कोकिळेची आहेत हे कळते.

**गवई :** दयाळ हा गाणाऱ्या पक्ष्यांतला श्रेष्ठ गवई. थंड हवेत हा सफाईदार पण सौम्य शीळ घुमवितो. वसंत ऋतूत मात्र तो कर्णमधुर सुरांनी वातावरण भारून टाकतो. हा दिसायलाही सुंदर दिसतो. विशेषतः मधुर सुरांची रिमझिम



बहिरी ससाणा



विणकर

करीत असताना आणि काळ्या पांढऱ्या शेपटीला हलकासा झटका देऊन वर उडविताना हा रुबाबदार दिसतो.

**नृत्यांगना :** ‘नाचरा’ पक्षिणीचे नृत्य पाहण्यात एक आनंद आहे. मोठ्या डौलाने फांद्याफांद्यावरून ती झेपावते, मध्येच थांबते, इकडे तिकडे वळते, नाचते. शेपटीचा गोल पिसारा पंख्यासारखा ती सतत उघडते, मिटविते. या बाजूकडून त्या बाजूकडे वळविते. वारा घेण्यासाठी एखादी स्त्री जशी आपला पंखा वळवते तसेच.

**विणकरी :** विणकर पक्ष्याचे घरटे शिंप्यासारखेच उत्तम विणलेले असते. गवत किंवा तागाचे तंतू यापासून विणकर आपले घरटे विणतो. त्याची वीण मजबूत असते आणि आकार एखादया दोरीने टांगलेल्या विजेच्या दिव्याच्या गोलासारखा असतो. घरट्याच्या आत कप्पे असतात. नळकांड्या-सारखा चिंचोळा एक भाग असतो तर दुसरा पैस खोलीसारखा. या पैसभागात बाया अंडी घालते. चिंचोळ्या भागामुळे शत्रू अंड्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. हे पक्षी आपले घरटे लपवीत नाहीत, उलट गजबजलेल्या ठिकाणी बांधतात. घरटी लहान-मोठी, निरनिराळ्या आकारांची असतात, आणि ती बहुधा पाण्यावर झुकलेल्या फांदीच्या टोकाशी किंवा फूल नसलेल्या झाडाला, पानाशी टांगलेली दिसतात.



नाचरा




बदक

**खाटीक :** 'टीव किंवा लटोरा' पक्ष्याला त्याच्या करणीवरून खाटीक हे नाव मिळालेले आहे. त्याची सवय मोठी विचित्र आहे. हा आपले भक्ष्य काटेरी झुडपावर सुळावर चढविल्याप्रमाणे टोचून ठेवतो.

नेहमी हा भुकेपेक्षा जास्त शिकार करतो व खाऊन शिल्लक उरलेले अशा प्रकारे साठवून ठेवतो. कीडमुंगीवर त्याचे भागते. पण उंदीर, आणि पाली मारायलाही हा मागेपुढे पाहात नाही. आपल्या आकड्या-सारख्या बळकट चोचीने तो त्याचे तुकडे तुकडे करतो.

**प्रवासी :** देशोदेशी प्रवास करणाऱ्या वा वस्ती करणाऱ्या पक्ष्यांत रानबदक हे एक आहे. सर्व जातींची बदके हिवाळ्यात युरोप, उत्तर आशिया, लडाख आणि तिबेट या देशांतून भारतात येत असतात.



खाटीक



शिंगचोच

# ४. निवासस्थान

हरतऱ्हेच्या पक्ष्याचे त्याचे स्वतःचे असे एक घर किंवा निवासस्थान असते, सराईत पक्षी-निरीक्षक, जंगल, गवताळ प्रदेश, तलाव, दलदल किंवा शेत पाहूनच कोणते पक्षी तेथे सापडतील हे सांगू शकतो. काही पक्षी जगभर आढळतात, तर काहींनी स्वतःला एका विशिष्ट स्थळी जखडून घेतलेले असते. काही, थंडीच्या दिवसांत ऊब आणि अन्न मिळविण्यासाठी एका देशातून दुसऱ्या देशातही स्थलांतर




करून वस्ती बदलतात आणि वसंत ऋतूत अनुकूल हवामान होताच मायदेशी परत येतात.

सपाटी आणि उंची यांचाही परिणाम पक्ष्यांच्या आकारावर होतो. हिमालयातून केपकोमोरीनकडे जाताना एकाच जातीचे पक्षी आकाराने हळूहळू लहान लहान होत चाललेले दिसतात. हिमालय आणि इतर पर्वतांवरील थंड, उंच स्तरावर पक्षी आकाराने मोठे दिसतात. पायथ्याशी त्या मानाने लहान दिसतात. पक्ष्यांच्या रंगावरही हवामानाचा परिणाम होतो.

हवामानाच्या खालोखाल पक्ष्यांच्या जीवनावर परिणाम करणारी महत्वाची गोष्ट म्हणजे वनस्पती. खद्द वनस्पतीचीच वाढदेखील प्रदेश, उष्णतामान, पाऊसपाणी आणि भौगोलिक स्थिती यांवर अवलंबून असते. कसलेली शेतजमीन, फळबागा आणि उद्याने यात वाढणारी वनस्पती, जंगलातल्या वनस्पतीपेक्षा वेगळी असते.


आपल्याकडील जंगलांमधून देखण्या शोभिवंत पक्ष्यांची रेलचेल आहे. उदाहरणार्थ, विचित्र रंगाचा बहुरंगी शिंगचोच्या, काळ्यापांढऱ्या रंगाच्या या पक्ष्यांच्या चोची मेणचट पिवळ्या रंगाच्या शिंगासारख्या असतात. सोनेरी रंगाचे कांचन, शेंदरी, काळ्या आणि पिवळ्या वर्णांचे विस्फुल्लिंग, बुलबुल, चंदेरी शुभ्र रंगाचे कोट घातलेले आणि निशाणासारखी लांब शेपटी फडफडवीत खूप खूप उंच भराऱ्या मारणारे स्वर्गीय नर्तक असे कितीतरी पक्षी आहेत. त्याचप्रमाणे जांभळ्या,

हिरव्या, किरमिजी आणि पिवळ्या रंगातील शिंजिर पक्षी, हिरवेगार दिसणारे मोर आणि अन्य झगमगत्या रंगांचे किती तरी पक्षी आहेत.

खेड्यापाड्यांतील, फळबागांतील आणि उद्यानांतील पक्षीच आपल्या अधिक परिचयाचे असतात. चिमण्या माणसाच्या अवती-भवतीच राहतात. कारण तेथे पोट भर अन्न मिळेल हे त्यांना ठाऊक असते. काजळी तपकिरी रंगाच्या कितीतरी मैना सभोवती अर्धवट झेपावताना, अर्धवट ठुमकत, ऐटीत चालताना आढळतील. काळ्या पांढऱ्या रंगातील मजेदार मैना तर सदा घाईगर्दीत दिसतात. याचप्रमाणे द्याळ आणि काळ्यापिवळ्या रंगांचे बण्गुली झाडांभोवती भिरभिरत असतात.

जेथे लागवडीखाली असलेल्या जमिनीचा लांबच लांब पट्टा असतो आणि झाडीही कमी असते, अशा ठिकाणी जमिनीवर वावरणारे पक्षी आढळण्याचा संभव फार. चंडोल आणि वटवट्या, त्याचप्रमाणे भुरकट, तांबूस वर्णाचे कस्तूर पक्षी येथील रहिवासी होत.

काही पक्ष्यांना कुरणे, दलदल यांच्याजवळ, तर काहींना तळी, ओढे, नद्या यांच्या काठावर राहणे आवडते. जमिनीवर राहणाऱ्या पक्ष्यांपेक्षा पाण्याजवळ राहणाऱ्या पक्ष्यांचा अभ्यास करणे फार बिकट असते.



मैना



सारस


## ५. पक्ष्यांची भाषा

पक्ष्यांना त्यांची भाषा असते. तिचा ते निरनिराळ्या कारणांसाठी वापर करतात. आपल्यासारखी त्यांची भाषा गुंतागुंतीची नसते, पण तिच्यामार्फत ते एकमेकांशी बोलू शकतात. भावना व्यक्त करू शकतात. विशिष्ट वर्गांतील पक्ष्यांची विशिष्ट तऱ्हेची सुरावट असते, त्यामुळे ते ओळखू शकतात. भयसूचक किंवा सावधगिरीची सूचना देणारे इशारेवजा सूर असतात. त्यायोगे ते एकमेकांतील अंतर कमी-जास्त करतात. तसेच प्रणयाराधनेसाठी उपयुक्त असे प्रेमाचे सूरही असतात. अशा आराधनेसाठी या सुरांचे महत्व फार. विरोधकाला आव्हान देण्यासाठी, विरोध दर्शविण्यासाठी आणि कधी कधी युद्धाची आरोळी देण्यासाठी ते कर्कशपणाने ओरडतात.

काही पक्षी शांत असतात तर काही कलकलाट करणारे असतात. जणू काही कितीतरी प्रकारचे स्वर त्यांना माहीत असतात. डोंगरी मैना आणि पोपट हे पक्षी उत्तम बोलू शकतात, तर इतर पक्षी उत्कृष्ट गाऊ शकतात. किंचाळणे, रेकणे, कर्कश ओरडणे, हुर्यो करणे, कण्हणे आणि शीळ घालणे हे तर पक्षीजगातील परिचयाचे स्वर होत.

उदाहरण दयायचे म्हणजे सारस हा आपल्या खालच्या जबडयाने आवाज काढून खडखडाट करीत असतो, तर सुतार पक्षी झाडावर एकसारखी चोच आपटून ढोलक बडविल्यासारखा आवाज काढीत असतात.

तुतवार



पक्ष्यांच्या पिल्लांची अशी एक स्वतंत्र भाषा असते. ती भाषा ती पिल्ले मोठी झाल्यावर वापरीत नाहीत. आपल्याला काय हवे, आपली भीती, आईवडिलांची चाहूल येवढ्यापुरते त्यांना त्यांच्या भाषेने कळते. पण ही पिल्ले आपल्या गटातील गाण्याचे आणि ओरडण्याचे, खुणेचे स्वर कसे शिकत असतील बरे? तर प्रयोगाने असे सिद्ध झालेले आहे की, काहींना अनुवंशिकतेने आणि इतरांना आईवडिलांचे अनुकरण केल्याने ते शिकता येते.

मुलांना वाटते की पक्षी आपल्या चोचींने गातात. पक्ष्यांना चांगले गाता यावे म्हणून काही दुर्दैवी पक्ष्यांची जीभ कातरण्याचा उद्योगही पक्षीप्रेमी मंडळी जुन्या काळी करीत असत. परंतु श्वासनलिकेतून जेथे फुफ्फुसातल्या श्वासनलिका विभागल्या जातात त्या ठिकाणाहून पक्ष्यांचा आवाज उमटतो. यासाठी एक लहान, नाजूक त्वचातंतुची जाळी ह्या ठिकाणी चिकटलेली असते. तिच्यायोगेच पक्ष्याचा स्वर निर्माण होत असतो.

लहान आणि मातकट रंगाचे पक्षी उत्तम गाणारे असतात. त्यांना देखणा पिसारा नसतो, पण त्यांची जागा ते मधुर आवाजाने भरून काढतात. इतर पक्षी मात्र आपल्या भडक रंगांनी लक्ष वेधून घेतात.

पक्ष्याचा सुगावा लावण्यासाठी पक्षीनिरीक्षक हे आपल्या डोळ्यांपेक्षा कानांवरच अधिक अवलंबून असतात. चालताना ते पक्षी मधून मधून मुद्दाम थांबतात. छपून बसलेल्या पक्ष्यांचा स्वर कुठून ऐकू येतो का, हे पाहातात. उन्हाळ्याच्या प्रारंभी आणि सर्व वसंतऋतूभर पक्ष्यांचे स्वर मोठ्याने आणि स्पष्ट, छान ऐकू येतात. निसर्गसंगीत ऐकण्याची सर्वोत्तम वेळ म्हणजे प्रातःकाळ आणि सायंकाळ.

## ६. प्रणयाराधन आणि सजावट

अंडी घालण्याच्या वेळी पक्षी जागा निवडतात, प्रियाराधन करतात, शत्रूशी झगडतात, जोडा ठरवितात. नंतर घरटे बांधण्याचे आणि पिल्लांच्या पालनपोषणाचे कर्तव्यकार्य सुरू करतात.

वसंतऋतूमध्ये सगळीकडेच चैतन्य भरलेले दिसते. या काळी मादीला आपली जोडीदारीण बनविण्यासाठी नर हरतऱ्हेने खूप करण्याचा प्रयत्न करतो. विवाहकाळचा देखणा पिसारा फुलवतो. वर्षभरातल्या या विशिष्ट काळी त्याची पिसे, तुरा, कंठ, निमुळती मान, काटे, नक्षी, शरीरावरील रंगीबेरंगी पट्टे, धारदार चोची, पाय, पंजे, सगळेच मोठे विलोभनीय दिसते. याउलट मादी फिकट वर्णाची दिसते. याचे कारण तिला घरट्यावर बसून संकट पिटाळायचे असते. शत्रूची नजर चुकविण्याच्या दृष्टीने तिला हे फिके रंग फायदेशीर ठरतात. आश्चर्याची गोष्ट अशी की पाणलाव किंवा दुर्लाव यासारख्या काही पक्ष्यांच्या जमातीत मादी अंडे घालून भपकेदारपणे बाहेर पडते आणि नर ती सांभाळीत उबवीत बसतो.

आपला राष्ट्रीय पक्षी मोर, याला कधी प्रणयाराधन करताना तुम्ही पाहिले आहे काय? पाहण्यासारखे दृश्य असते ते. तो पहिल्यांदा मादीकडे जातो तोच बादशाही थाटात. मग आपल्या भव्य पिसाऱ्याचा पंखा उघडतो. रेशमी धाग्यासारखी तलम झालर असलेला, सोनेरी वर्खासारखा झगमगणारा आणि प्रत्येक पिसाच्या मागे रंग बदलणारा, जिवंत डोळ्यासारखा तजेलदार सुंदर ठिपका असलेला तो किती सुंदर पिसारा.


प्रारंभी मोर नाचताना मादीला आपल्या पिसाऱ्याचा पाठीमागचा एकरंगी फिकट भाग दाखवतो. नंतर एकदम तो गिरकी घेतो आणि समोरासमोर येऊन आपल्या विविधरंगी पिसाऱ्याचे वैभव दाखवून दिपवून टाकतो. मोर नाचत असताना पिसारा जलद गतीने हालतो त्यावेळी त्या पिसाऱ्यावरील डोळे हसताना, चमकताना दिसतात. हिरवा, निळा, राजवर्खी, सोनेरी आणि पुन्हा हिरवा असे त्याचे रंग बदलताना दिसतात.

प्रणयाराधनेचे पक्ष्यांचे भिन्न भिन्न प्रकार असतात. काही पक्षी तर हवेतच कोलांटया घेऊन दाखवितात. ज्यांना रंगीबेरंगी पाय असतात ते हवेत उडतात. मादीचे लक्ष वेधून घेण्यासाठी तरंगत, लटकून

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ....... दि .......
क्रमांक 3533 नोंद दि. 30-13-69

लावी





पाणलाव

राहतात. काही पक्षी आपली चमकदार पिसे फुलवून मादीभोवती पिंगा घालीत राहतात.

पक्षी आपले घरटे कुठेतरी बांधीत नाही. घरट्याची जागा तो काळजीपूर्वक निवडतो. पिल्लांना सहज रीतीने दाणा आणून भरविता येईल अशी जागा त्यांच्या दृष्टीने महत्त्वाची असते.

घरट्याची जागा ठरविताना त्यांच्यात पुष्कळ भांडणे होतात. पण एकदा का भांडण मिटले, म्हणजे मग ते घरमालक होतात, आणि मन वळविण्याचे पुढचे सगळे कार्य शांतपणाने पार पडते. त्यानंतर नर मादीबरोबर प्रणयाराधन करतो आणि मग घरटे बांधायला सुरुवात करतो, पिल्लांचे पालनपोषण करतो.

## ७. घरटी आणि अंडयांची काळजी


स्वतःचा जीव सुरक्षित ठेवण्यासाठी पक्ष्यांना बिकट स्वरूपाचा झगडा सतत दयावा लागतो. अंडी घालण्याचा काळ हा तर पिल्ले आणि त्यांची मातापितरे यांना भयंकर धोक्याचा काळ. सरडे, साप, उंदीर, खारी, माकडे आणि माणसेसुद्धा पक्ष्यांची अंडी पळवितात. इतर पक्षीसुद्धा विश्वासू नसतात. कावळे आणि कुरव हे तर कुप्रसिद्ध दरवडेखोर आहेत.

पक्षी, ओबडधोबड किंवा नीटनेटकी घरटी आपल्या गरजेनुसार बांधतात. सामान्यतः त्यांची घरटी सहा प्रकारची असतात.

१) **माथ्यावर उघडी असणारी घरटी :** खोलगट कपाच्या आकाराची ही घरटी अंडी किंवा पिल्ले खाली पडू नयेत यासाठी उपयुक्त असतात. धागे, केस, लाकूड आणि लुसलुशीत पिसेसुद्धा आतील बाजू मऊमऊ करण्यासाठी वापरतात. अशी घरटी बहुधा कावळे, करकोचे आणि कबुतरे बांधतात. हे पक्षी गटाने किंवा जोडप्याने राहतात व स्वतःचे संरक्षण करू शकतात.

२) **बंदिस्त घरटी :** घुमटासारख्या छपराची सगळीकडून बंदिस्त अशी जी घरटी असतात त्यांना एका बाजूने फक्त एक लहानशी वाट असते. लहानशी पिसे, किंवा केस पसरून घरटयाची आतील बाजू गुबगुबीत केलेली असते.

३) **बोगदयातील घरटी :** खंडया, दिव्यक आणि पंकोळी हे पक्षी आपल्या चोचीने नदीकाठच्या जमिनीत बोगदा किंवा खड्डा खणून घरटी करतात.



भांडीक
पकोळी
बुलबूल
शिंगचोचा
सातभाई
करकोचा
टिव्यक
रोहित

४) **बिळातील घरटी :** सुतार, घुबड, पोपट, मैना आणि शिंगचोचा हे पक्षी, झाडे, खडक, आणि भिंतीमधील बिळातून घरटी करतात. ते बिळे पाडतात किंवा नैसर्गिक बिळे वापरतात. शिंगचोच्याची तऱ्हा आगळीच आहे. शिंगचोच्याची मादी जेव्हा झाडाच्या ढोलीत बसून अंडी उबवू लागते, तेव्हा नर तिच्याभोवती भिंती उभ्या करतो. या सगळ्या अवधीत नर अतिशय मेहनत करतो, घरट्याला मुद्दाम ठेवलेल्या लहानशा भोकातून तो मादीला अन्न पुरवितो.


५) **बाहेर जाताना झाकावयाची घरटी :** पाणडुबी, पाणकोंबडी आणि बदक यांच्या घरट्याच्या माथ्यावर छप्पर नसते. परंतु बाहेर पडण्यापूर्वी अंडी काळजीपूर्वक झाकून ठेवण्याची खबरदारी नर मादी घेतात. पाणडुबी पक्ष्याची घरटी तरंगणाऱ्या तराफ्यासारखी कुजलेल्या झुडपांची असतात. ती घरट्यापेक्षा निर्जीव वनस्पतीसारखी दिसतात.

६) **घरटी नसलेली घरटी :** नदीसुरय, प्लवर, टिटवी व चष्मेवाला प्लवर हे पक्षी खऱ्याखुऱ्या अर्थाने घरटी बांधीतच नाहीत. ते जमिनीवरच अंडी घालतात. त्यांची अंडी सभोवतालच्या वातावरणाशी इतकी मिळतीजुळती असतात की, ती शोधणेही कठीण. प्लवर पक्षी लहानसे शिंपले व गारगोट्या जमवितात. किनाऱ्यावरील खडकावर ठेवतात, आणि त्यावर अंडी घालतात.

बहुधा, अंडी उबविण्याचे काम एकटी मादीच करते, परंतु कर्तव्यदक्ष नर मात्र मादीला केव्हाही आणि कसल्याही कामात मदत करायला तयार असतो. कधीमधी तो अंडी उबवीत बसतो आणि मादी दाणा टिपण्यासाठी टुणटुण उडते, पाय मोकळे करते. पुष्कळसे पक्षी वर्षातून एकदाच अंडी घालतात. परंतु पहिल्यांदा घातलेली अंडी जर फुटली, चोरीला गेली, तर मादी दुसऱ्यांदा अंडी घालते.

"अंडयाच्या आकारा" सारखीच काही सगळी अंडी नसतात. जे पक्षी झाडांच्या ढोलीत, खडकात, ओसाडीत, म्हणजे अशा जागा की जेथून ती घरंगळून पडणार नाहीत, अशा ठिकाणी अंडी घालतात. त्यांचा आकार गोल असतो. टिटवी आणि त्याच जातीचे इतर पक्षी यांची अंडी आकाराने "पेअर" फळासारखी असतात. पक्षी ही अंडी, त्यांचे निमुळते टोक आतल्या बाजूला वळवून वर्तुळाकार ठेवतात. त्यामुळे जागाही कमी लागते. काही पक्षी सपाट खडकावर किंवा समुद्रकाठच्या कडयावर एकच एक मोठे, लांबट अंडे घालतात.

अन्नपुरवठा, संरक्षण, पात्रता आणि सवयी यावर भिन्न भिन्न जातींच्या पक्ष्यांचे अंडे घालणे अवलंबून असते. काही पक्षी एकच अंडे घालतात, काही दोन, तर काही चार. गरुड एक ते चार, वदके पाच ते सोळा आणि बष्गुली पक्षी चार ते सहा अंडी घालतात. जे पक्षी जमिनीवरच राहतात, ज्यांना वेताचे उडता येते आणि ज्यांना संकटाचा धोका जास्त असतो ते पक्षी सर्वसाधारणपणे वीस अंडी घालतात. पुष्कळशा मादया घरटयांत अंडी घालतात.



अंडयांच्या कवच्यांचा रंग आणि त्यावरील ठिपके ह्यामुळेदेखील त्यांचे उत्तम संरक्षण होऊ शकते. सुतार, खंडया, पोपट आणि घुबड यांची घरटी बंदिस्त असतात, त्यामुळे त्यांना संरक्षक रंगाची गरज नसते. त्यांची अंडी पांढरी शुभ्र असतात. शिवाय अंधारातसुद्धा नरमादीला आपली पांढरी अंडी पटकन दिसतात. परंतु जी घरटी उघडी असतात तेथील अंडयांना सभोवतीच्या वातावरणाचा रंग असतो. त्यामुळे शत्रूला ती सहजासहजी ओळखता येत नाहीत. पुष्कळशी अंडी, धुरकट, हिरवी, निळी, तपकिरी, जांभळी, किंवा गुलाबी रंगाची असतात.


पुष्कळशा अंडयांचा पृष्ठभाग गुळगुळीत किंवा चकचकीतसुद्धा असतो. काही अंडी एकदम लखलखीत दिसतात, तर काही खडबडीत आणि ठिसूळ असतात.

नर किंवा मादी अंडयांना उष्णता देण्यासाठी त्यावर बसते. पुरेशी उष्णता मिळावी म्हणून अंडी उबविणारे पक्षी आपल्या पोटाजवळची पिसे गाळतात. पोटावर जरुरीप्रमाणे अशी मोकळी जागा एक ते चार ठिकाणी असू शकते. त्याला अंडी उबविण्याची जागा असे म्हणतात. अशा जागेशी अंडी व्यवस्थित चिकटतील याची खबरदारी घेऊन पक्षी अंडी उबवितात. अन्न शोधण्यासाठी पक्षी जेव्हा बाहेर पडतात तेव्हा अंडयांना जो गारठा लागतो तो बाधक ठरत नाही. लहान पक्ष्यांना कमीत कमी अकरा दिवस आणि मोठयांना जास्तीत जास्त ऐंशी दिवस आपली अंडी उबवायला लागतात. कीडमुंगी खाणारे मृदू चोचीचे पक्षी आणि बीज खाणारे कठीण चोचीचे पक्षी, आपल्या पिल्लांसाठी अन्न शोधण्याकरिता पहाटेपासून ते अंधार पडेपर्यंत कष्ट करीत असतात. थोडे चावून हलके केलेले अन्न काही पक्षी आपल्या पिल्लांना भरवितात. कबुतरांची पिल्ले आपल्या चोची आईच्या तोंडात खुपसून 'कबुतराचे दूध' घेत असतात. हे अन्न चावून अंशतः पाचकः बनविलेले असते आणि

अंशतः त्यात पक्ष्याच्या पोटातील स्राव मिसळलेला असतो. 'पेट्रल' नावाचा समुद्रावरील एक पक्षी, मासा खाताना माशाचे तेल लपवून वेगळे ठेवतो आणि ते आपल्या पिल्लांना भरवितो. कशा का रीतीने होईना, पण पिल्लांना भरविणे हे मोठे कटकटीचे व कष्टाचे काम आहे खरे. आणि पिल्ले मोठी होऊन स्वतःचे पाहू लागेपर्यंत हे काम पक्ष्यांना करावेच लागते.

चिमणी, चंडोल आणि सारिका हे पक्षी जेव्हा जन्मतात तेव्हा त्यांचे डोळे मिटलेलेच असतात. त्यामुळे ते अगदीच असहाय्य असतात. त्यांना आपले घरटे सोडून जाण्याइतपत शक्ती यायला एक आठवडा किंवा जवळजवळ पंधरवडाही लागतो. तर बदकाची, कोंबडीची, प्लवर आणि इतर पक्ष्यांची पिल्ले अंड्यातून बाहेर येतानाच मऊ परांचा जाड कोट घालून येतात. अंडे फोडून बाहेर येताच ती पिल्ले घरटे सोडतात, आपले अन्न टिपतात, पळतात व पोहतात सुद्धा!

पिल्लांना अन्न भरवीत असलेले कबुतर



पिल्लासह प्लवर



मोठ्या धाडशीपणाने शत्रूवर हल्ला करून पक्षी आपल्या पिल्लांचे संरक्षण करतात. एक लहानसा बुलबुल जोरदारपणाने एका घारीला पळवून लावीत असताना मी पाहिले आहे. संकट जवळ आले की पक्षी सावध राहण्याची सूचना एकमेकांना ओरडून देतात त्यामुळे पिल्ले चटदिशी आईच्या पंखांचा आश्रय घेतात.

प्लवर पक्ष्याच्या पिल्लांमध्ये जमिनीवर दबा धरून बसण्याची प्रवृत्ती फार प्रबळ असते. ती समुद्रकिनाऱ्यावर उघडी बसतात तर काही पक्षी तुरळक हिरवळीत बसतात. आईने दिलेली धोक्याची हाक ऐकून किंवा संकटाची नुसती सरपटत्या पंखाची सावली पाहून, पिल्ले जमिनीला बिलगून दबून अगदी हालचाल न करता बसून राहतात. धोका टळेतो ती तशीच बसतात.

तितर आणि इतर पुष्कळसे पक्षी आपल्या पिल्लांना वाचविण्यासाठी जखमी किंवा लंगडे झाल्याची बतावणी करून पिच्छा पुरविणाऱ्याला फसवितात. आता हा जखमी पक्षी आपल्या तडाख्यात सापडणार अशा खात्रीने शत्रू त्याच्या मागे जातो तोच तो पक्षी उठून त्याच्यादेखत एक दोन वार घगरंळत दूर जातो. असे थोडे अंतर काटले की तो उठून भुरकन उडून जातो.

तथापि, हे सगळे प्रेम आणि काळजी घेऊनसुद्धा हजारो पिल्ले दरवर्षी नष्ट होत असतात.

## ८. देशांतर आणि पक्ष्यांना वाळे घालणे

पक्षी जीवनात देशांतर अथवा स्थलांतर ही एक मोठी गूढ घटना आहे. दरवर्षी शरद ऋतूत अथवा हिवाळ्याच्या प्रारंभी, उत्तर आशियातील युरोप व अमेरिका या उत्तर विभागातील पक्षी, आपल्या अंडी घालण्याच्या स्थळापासून दूर दक्षिणेकडील उष्ण प्रदेशांकडे वस्ती करण्यासाठी प्रयाण करीत असतात. वसंत ऋतूमध्ये आणि उन्हाळ्याच्या प्रारंभी ते पुन्हा परत यायला निघतात.


वाईट हवेमुळेच एखादे वेळी विलंब झाला तर, नाही तर पक्षी फार वक्तशीर असतात. इतके की पाठीवर हिवाळा घेऊन येणारे आपले पक्षीमित्र बरोबर कोणत्या दिवशी येतील हेदेखील आपण आदमासाने सांगू शकतो.

काही जातीतील पक्षी फार लांब जात नाहीत. पण एका भागातून दुसऱ्या भागाकडे जात असतात. राहण्याची जागा धुंडण्यासाठी आणि विविध खाद्यपदार्थ मिळविण्यासाठी धडपड करायला सगळ्याच पक्ष्यांना ठराविक स्थायिक हालचाल करावी लागते. उत्तर भारतात ऋतू ठरलेले असल्यामुळे अशा तऱ्हेची धडपड तेथे प्रामुख्याने आढळून येते.

जे पक्षी उन्हाळ्याचे दिवस उंच पर्वतावर घालवितात ते हिवाळ्यात पर्वत पायथ्याशी किंवा सपाटीवरदेखील उतरतात. गंगेच्या सपाटीला लागूनच हिमालय पर्वत असल्याने पक्ष्यांच्या प्रवासाची ही तऱ्हा भारतामध्ये अगदी रूढ आहे.

तरुण शूर पर्यटक पक्ष्याला उंच गिरीशिखरांवरून, अरण्यांवरून, मैदानांवरून आणि अथांग पाण्यावरून लांबवरचा प्रवास हवेतून करताना कितीतरी प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागते. कष्ट भोगावे लागतात. कधी कधी अकस्मात वादळे उत्पन्न होतात

कूरल




आणि पक्ष्यांना त्यांच्या मार्गावरून दूर हिसकावून नेतात. वारंवार ते समुद्राकडेही ढकलले जातात. आणि खवळत्या लाटांच्या भक्ष्यस्थानी पडतात. कधी रात्रीच्या वेळी झगझगीत दिवे त्यांचे लक्ष वेधून घेतात आणि मग त्यांचा गोंधळ उडतो.

देशांतर करणारे पक्षी फार वेगाने कधी उडत नाहीत. त्यांचा वेग सामान्यपणे ताशी ४८ ते ६४ किलोमीटरइतका असतो आणि क्वचित ८० पर्यंत वाढतो. लहानगे पक्षी मात्र ताशी ४८ किलो-मीटरपेक्षा क्वचितच आपला वेग वाढवू शकतात. किनाऱ्यावरील बहुतेक पक्षी ताशी ६४ ते ८० किलोमीटर या वेगाने उडतात. तर पुष्कळशी बदके ताशी ८० ते ९६ किलोमीटर या वेगाने प्रवास करतात. देशांतर करणारे पक्षी सर्वसामान्यपणे ९०० मीटर उंचीच्या खालीच उडत असतात, पण काही प्रवासी कधी कधी अतिशय उंचीवरून प्रवास करतानाही आढळलेले आहेत.

काही पक्षी वाटेत विश्रांतीसाठी थांबत थांबत, टप्प्याटप्प्याने, दूरचा प्रवास सुकर करतात. तर काही विश्रांतीसाठी किंवा अन्नासाठी न थांबता लांबचा पल्ला एकदम गाठतात. काही पक्षी दिवसाच उडतात, तर काही दिवसा आणि रात्रीदेखील उडतात. पण पुष्कळसे सूर्यास्तानंतर अंधारातूनच जलदीने मार्ग काटतात.

सामान्यपणे पक्षी थवेच्या थवे करूनच प्रवास करतात. सारस आणि हंस पक्ष्यांचा थवा आभाळांतून 'V' या इंग्रजी अक्षरासारखा आकार करून वेगाने उडत जाताना सर्वांचे लक्ष वेधून घेतो.



हंस

भांडिक, नाचण, वटवटया व किनाऱ्यावरील आणि पाण्यात राहणारे पक्षी हे आपापल्या जातीनुरूप गटाने जमतात. मग मोठयाने पंख फडफडवितात, कलकलाट करतात, चीःकारतात आणि आकाशात झेप घेऊन उडतात व लांब जातात.

बहुधा पक्ष्यांतील ब्रम्हचारी नर मंडळ अंडी घालण्याच्या ठिकाणी आधी जाऊन पोहोचते आणि नंतर त्याच्या मागोमाग मादया थोडयाच दिवसांत जाऊन पोहोचतात.

बदलत्या ऋतुमानाप्रमाणे पक्ष्यांच्या हालचाली होत असतात हे फार पूर्वीपासून लोकांना माहीत होते. पण पक्षी का प्रवास करतात अथवा कुठे जातात याविषयी लोकांच्या विचित्र कल्पना होत्या. एखादया विशिष्ट ऋतूत एखादया ठिकाणी पक्षी दिसले नाहीत तर ते त्याचे कारण असे सांगत की या सबंध हिवाळाभर पक्षी स्वतःला चिखलामध्ये पुरून घेतात व तेथेच झोपा काढतात.


अलीकडे पक्ष्यांच्या देशांतराविषयी सखोल अभ्यास सुरू झाला आहे. पक्ष्यांच्या सवयीचे प्रत्यक्ष निरीक्षण करून आणि त्यांच्या पायांत वाळे अडकवून याविषयी बरीच माहिती मिळविलेली आहे. कृत्रिम परिस्थिती निर्माण करून त्यायोगे पक्ष्यांवर काय परिणाम होतो याचा अभ्यास करण्यात येतो व त्यावरून पक्ष्यांच्या हालचालींची माहिती मिळविता येते.

मोठे पक्षी आणि पिल्ले यांच्या पायांत वाळे घातल्याने त्यांच्या देशांतराविषयी खूपच माहिती आज उपलब्ध झाली आहे. पक्ष्यांना पकडून त्यांच्या पायांत धातूचे किंवा प्लॅस्टिकचे हलके वाळे घालण्यात येतात. वाळ्यांवर क्रमांक, दिनांक, खुणेचे चिन्ह आणि पत्ता दिलेला असतो. ज्याला तो वाळा सापडेल त्याला त्या पत्त्यावर तो परत करण्याची विनंती केलेली असते. वाळा घालून पक्ष्याला मुक्त सोडण्यात येते. असा पक्षी जर कुठे मारला, पकडला गेला किंवा मृतावस्थेत सापडला तर त्यावरून त्याच्या देशांतराची दिशा, आणि स्थळ यांचा सुगावा लागू शकतो.

या वाळ्यांवरून पक्ष्यांच्या देशांतराची दिशा प्रामुख्याने शरद ऋतूमध्ये उत्तरेकडून दक्षिणेकडे आणि वसंत ऋतूत दक्षिणेकडून उत्तरेकडे असते हे सिद्ध झालेले आहे. याप्रमाणे प्रमुख पक्षी-प्रवासी भारतात, वायव्य दिशेकडून येतात. तसेच ते लेक बैकल आणि सैबेरियातील अरल समुद्र या दोहोंच्या मध्ये असलेल्या भागातून निघतात. परंतु काही सारस पक्षी मात्र पश्चिम जर्मनीसारख्या दूर देशातून येत असतात.


मंगोलिया, चीन आणि तुर्कस्तानातून येणारे पक्षी दुसऱ्या मार्गाने म्हणजे, ईशान्य हिमालयातील खिंडीवरून येणाऱ्या मार्गाने येतात. भारतात येण्याचे दोन मुख्य मार्ग म्हणजे हिमालयातील, ईशान्येकडील


वाळे घालणे



आणि वायव्येकडील खिंडीवरून येणारे मार्ग होत. परंतु काही पक्षी वळसा न घालता हिमालयाच्या रांगा सरळ ओलांडून येतात.

पक्षी फार मोठे अंतर काटतात हे त्यांना घातलेल्या वाळ्यांवरून सिद्ध झालेले आहे. विश्वास ठेवावा असे काही पुरावेसुद्धा आहेत. हिवाळ्यात रानकोंबडा हिमालय ते निलगिरी हे २,४०० किलोमीटर अंतर, न थांबता काटतो. मध्य आशिया आणि सैबेरियाकडून, हिमालयावरून ३,२०० ते ४,८०० किलोमीटर येवढे अंतर काटून, रानबदके आपल्याकडील सरोवरांत येत असतात. पूर्व युरोप अथवा मध्य आशियामधून गुलाबी मैना येतात. चिमणीच्या आकाराचे 'धोबी' पक्षी हिमालयाच्या भागातून आणि मध्य आशियातून सपाटीवर येत असतात. चिमणीपेक्षा निम्म्या आकाराचा सर्वांत लहान असा फुटकी





कोकीळ

नावाचा पक्षी ३,२०० किलोमीटरचे अंतर काटून प्रत्येक हिवाळयात भारतात येत असतो.

प्रवासात अफाट संख्येने पक्षी मरत असतानाही ते का बरे देशांतर करतात? कडक थंडी आणि अन्नाचा तुटवडा यापासून बचाव करणे मूळ कारण होय. थंडीने पाणी गोठले म्हणजे मासळी व सागरी अन्न, पाणकोंबडयांच्या दृष्टीसही पडत नाही. घरटयांसाठी जागा मिळविणे आणि उन्हाळयातील उष्म्यापासून बचाव करणे हे वसंत ऋतूत देशांतर करण्यांचे मुख्य कारण असते.


खरोखरच पक्ष्यांचे देशांतर हा एक भारावून टाकणारा अभ्यास आहे. त्यातही अदयाप न उलगडलेले कितीतरी प्रश्न आहेत. उदाहरणार्थ, पक्ष्यांना प्रयाण केव्हा करावे हे कसे कळते? काही खाणाखुणा नसता समुद्रावरील मार्ग त्यांना कसा उमगतो? वर्षानुवर्षे त्या स्थळी परत येण्याचे त्यांना कसे जमते? छोटे कोकीळ आपल्या पोषणकर्त्या माता-पित्यांना सोडण्याच्या अवस्थेत येण्यापूर्वीच कित्येक आठवडे, मोठे कोकीळ भारत आणि आफ्रिकेकडे जायला निघतात, अशा अवस्थेत पूर्वानुभव आणि मार्गदर्शन नसतानाही ते मोठ्या पक्ष्यांना जाऊन कसे मिळतात? हे आणि असे पुष्कळ मनोरंजक प्रश्न सोडविण्यासाठी तुमच्यासमोर उभे आहेत.


# ९. शरीर–रचना


पक्ष्याची शरीररचना आणि प्रत्येक अवयवांचा उपयोग समजावून घेण्यात तर आणखीनच मनोरंजकता आहे. पक्षी हे एक प्रकारचे असे प्राणी आहेत की ज्यांच्या अंगावर पंखांचे आवरण आहे, माणसांच्या सांगाड्यासारखीच पक्ष्यांच्या सांगाड्याची रचना आहे. त्यांना दोन पंख, दोन पाय आणि शेपटी असते. पंखांची रचना अशा प्रकारे केलेली असते की ते इंग्रजी 'Z' अक्षराच्या आकाराप्रमाणे सहज मिटविता येतात. खांद्यापाशी मात्र पंखाची हालचाल मोकळेपणाने करता येते.


पक्ष्यांचे पंख म्हणजे जणू काही माणसाचे बाहूच. त्यात मुख्य फरक दिसतो तो हातापाशी. तो म्हणजे पक्ष्यांना हातवजा लांबसडक एकच बोट असते. या बोटाच्या हाडावर पंखांचे स्नायू आणि पिसे अशा रीतीने बसविलेली असतात की, पक्ष्यांच्या पंखांचे विशिष्ट वळण तयार व्हावे. पक्ष्यांच्या पसरलेल्या उघड्या पंखांकडे सहज दृष्टी टाकली तर छत्रीसारखे त्याचे वरच्या बाजूचे वळण दिसते. उघडी छत्री जर जलदीने वरखाली केली तर ती खाली ओढण्यापेक्षा वरती ओढणे सोपे जाते हे तुमच्या लक्षात येईल. असे का होते ? तर छत्रीच्या विशिष्ट वळणामुळे, ती खाली ओढताना हवा आत भरलेली राहाते. साधारणपणे हेच तत्व पक्ष्यांच्या भरारीला लागू पडते.

पंखांच्या पिसांचे वर्गीकरण स्पष्टपणे केलेले असते. लांबसडक बोटामध्ये अथवा हातामध्ये प्रथम उड्डाणाची किंवा 'प्राथमिक' स्वरूपाची पिसे असतात. ही बहुधा दहा असतात. त्यांचा सुकाणूसारखा उपयोग होतो. हाताच्या मधल्या भागापासून 'दुय्यम' स्वरूपाची उड्डाण-पिसे वाढतात. ही सुमारे बारा किंवा चौदा असतात.










सांगाडा

इतर पिसांचे पुंजके पंखांना आकार देण्यासाठी, वळण देण्यासाठी आणि उड्डाण पिसांना बळ देण्यासाठी असतात. जेथे खांदा पंखाशी जोडलेला असतो तेथील पिसांच्या पुंजक्याला 'स्कॅप्युलर्स' असे म्हणतात. पुष्कळशा पक्ष्यांमध्ये ही पिसे बरीच मोठी असतात. ती पक्ष्यांच्या शरीराला जोडलेल्या पिसांच्या रेषांना आकार देण्यास मदत करतात. त्याप्रमाणे पंख मिटविल्यावर पंख आणि शरीर यांचा सांधाही ते झाकून टाकतात. त्यामुळे बाहेरचा दमटपणा आत जात नाही व शरीराचे संरक्षण होते.

पक्ष्याची हाडे बळकट, हलकी आणि पोकळ असतात. ती वेष्टनाने ताकदवान असतात. गलबताच्या 'कण्या'सारखा वर दांडा असलेले छातीचे हाड रुंद असते. या दांड्याला छातीचे बळकट स्नायू जोडलेले असतात. या स्नायूंमुळेच पक्ष्यांना आपले पंख हालविता येतात.

पंखयाप्रमाणे एकमेकांची सरमिसळ होईल अशा तऱ्हेची पिसांची रचना, पक्ष्यांच्या शेपटीत असते. सामान्यपणे ही पिसे बारा किंवा चौदा असतात. मध्यभागीचे पीस शेपटीच्या अगदी वरच्या बाजूला, सुरवातीला असते. बाकीची पिसे खालच्या दोन्ही बाजूंस, एकमेकांत गुंतल्यासारखी असतात. पक्ष्याने शेपटी जवळ ओढून घेतली असताना मधली पिसे तेवढी तुम्हाला दिसतात. बाकीची खालच्या बाजूने आत वळवून घेतलेली असतात व त्यांचे दांडे तेवढे बाहेर दिसतात.

पक्ष्यांना शेपट्या फुगविता किंवा आखडता येतात, वर किंवा खाली करता येतात. सुकाणूप्रमाणे त्यांचा उपयोग होतो. चिमणी–ससाणा यांच्याप्रमाणे ज्यांना पंख व शेपटी भरपूर असते, त्यांची झेप



सुलभ आणि डौलदार असते. पाणलाव्यासारखी ज्यांची शेपटी आखूड आणि पंख लांबसडक असतात त्यांची झेप बहुधा जलद आणि हिसक्याची असते. परंतु टकाचोर पक्ष्यांप्रमाणे ज्यांची शेपटी लांब आणि पंख आखूड व गोलसर असतात. असे पक्षी मोठ्या कष्टाने फडफड करीत भरारी मारतात.

झेप घेण्याचे तीन प्रकार आहेत :

(अ) **फडफडाट**–बहुतेक पक्षी याच तऱ्हेचा उपयोग करतात.

(ब) **संथ वाहणे**–पंखांची कसलीही हालचाल न करता पुरेशी गती निर्माण करू शकणारे पक्षी या तऱ्हेने झेपावतात.

(क) भरारी किंवा उड्डाण ही सर्वांत वैशिष्टयपूर्ण तऱ्हा आहे. पंखांची कसलीही हालचाल न करता पक्षी गोल गोल मोठ्या फेऱ्या घालीत गती घेतो व भरारी मारतो.

फक्त उघड्यावरच जे पक्षी उडतात, त्यांचे पंख लांब, अरुंद व टोकदार असतात. या टोकांनी मोठा संगीतमय आवाज करीत ते विलक्षण वेगाने उडतात. जे पक्षी जंगलात राहतात त्यांचे पंख आखूड, गोलसर असतात आणि ते उड्डाणाच्या सुरवातीला आवाज करतात. परंतु आखूड पंख असले तरी घुबड मात्र झेप घेताना आवाज करीत नाही. कारण त्यांची पिसे एक प्रकारच्या मखमली धाग्यांनी आच्छादलेली असल्यामुळे आवाज आतल्याआत दबला जातो. आवाज बाहेर न उमटल्यामुळे शिकाऱ्यापासूनही त्याचा बचाव होतो.


निरनिराळे पक्षी निरनिराळ्या तऱ्हेने वरून खाली उतरतात. काही फुगविलेल्या शेपटया आखडून घेतात आणि खांदे वर करून पंख हलवीत त्यांची टोके जमिनीच्या दिशेने वळवितात. जमिनीला ती टेकताच, डौलदार रीतीने ती मिटवून घेतात. पक्षी आपल्या पिसांविषयी फार जागरूक असतात. ती स्वच्छ, नेटकी आणि तेल लावून नीट ठेवण्यासाठी ते आपला बराच वेळ खर्च करतात.

पक्ष्याच्या शेपटीच्या मुळाजवळ एक तेल-ग्रंथी असते. त्यातील तेल चोचीत घेऊन पक्षी चोचीने ते तेल पिसांना माखतात. पुष्कळसे पक्षी वर्षातून एकदा आपली पिसे गाळतात. याला 'पिसे टाकण्याचा काळ' असे म्हणतात. हा काळ शरद ऋतूमध्ये येतो. यावेळी लहान मोठे प्रत्येक पीस झडून जाते आणि त्या ठिकाणी नवीन पीस येते. काही पक्षी वसंत आणि शरद या दोन ऋतूंमध्ये म्हणजे वर्षातून दोन वेळा पिसे गाळतात, तर काही पक्षी आपला पिसारा वर्षातून तीन वेळा, अंशतः किंवा संपूर्णपणे बदलतात.

अन्न शोधणे आणि खाणे याला सहाय्यक अशाच सुरेख रचनेच्या चोची पक्ष्यांना लाभलेल्या असतात. घारी, गरुड, बहिरी ससाणे व ससाणे यांच्या चोची आखूड आणि आकड्यासारख्या असतात. त्यामुळे ते आपले भक्ष्य जलद आणि सहज रीतीने फाडून खाऊ शकतात. बगळ्याची चोच लांब असल्यामुळे निसटते मासे पकडता येतात. वॅडर पक्ष्यांच्या चोची लांब, संवेदनाक्षम आणि सळईसारख्या असल्यामुळेच, त्यांना भुसभुशीत चिखलात चोची खुपसून त्यातील अन्नपदार्थ उचलून घेता येतात. चिमण्यांची चोच आखूड, निमुळती असल्यामुळे त्यांना खायला लागणाऱ्या दाण्याचे टरफल काढून तो फोडताही येतो. बदकांच्या रुंद, पसरट चोचीत दातासारख्या लहान लहान चुण्यांच्या रांगा असतात. त्यामुळे पाण्यातील अन्नपदार्थ गाळून घेता येतात.

पाकोळ्या आणि पांगोळ्या यांच्या चोची आखूड असतात, परंतु त्यांचा जबडा रुंद असतो. त्यामुळे त्यांना उडते किटाणू पकडता येतात. चिमुकल्या सूर्यपक्ष्यांच्या चोची नाजूक, बाकदार असल्यामुळे मधासाठी त्या फुलात बुडविता येतात.

पक्ष्यांची चोच म्हणजे जणू काही हातच. चोचीने ते वस्तू पकडतात, उचलतात, वाहून नेतात, विणतात, शिवतात, आपल्या पिल्लांच्या गरजा भागवितात, शत्रूला मारतात व आपले रक्षण करतात.




कुतवार
चोची

आपल्या चोचीचा ते हत्यारासारखाही उपयोग करतात. चोचीचा हातोडा, सांडशी, लहान चिमटा, कात्री, अडकित्ता, आकडी, भाला आणि गाळणे यांसारखा उपयोग होतो. या सगळ्या कामामध्ये, इतर कुठल्याही प्राण्यापेक्षा, पक्ष्यांची मान फारच लवचिक असल्यामुळे तिची खूपच मदत होते. ती इतकी लवचिक असते की, पक्षी आपले डोके पूर्ण वर्तुळाकार वळवू शकतो.

पक्ष्यांचे पायदेखील त्यांच्या चोचीप्रमाणे अनेक प्रकारचे असतात. पळणे, दांडीवर बसणे, ओरबाडणे, दलदलीतून चालणे आणि पकडणे ही तर त्यांची कामे स्पष्टच आहेत. काही काही पक्षी पायांचा उपयोग, हल्ला करण्यासाठी किंवा बचावासाठी करतात. आपल्या आंगठ्यासारखे असणारे त्यांचे पहिले बोट मागच्या बाजूला असते. दुसरे आतल्या बाजूला असते. त्याला दोन हाडे असतात. तिसरे मध्यभागी असते आणि त्याला तीन सांधे असतात. चौथे बाहेरच्या बाजूला असते. त्याला चार सांधे असतात. बहुतेक पक्ष्यांच्या बाबतीत हीच रचना आपल्याला आढळून येते.

जे पक्षी डाहाळीवर बसतात आणि जमिनीवर दुडदुडतात त्यांना डाहाळी गच्च धरून ठेवण्यासाठी मागील बाजूस एक लांबसडक बोट असते. बदकांची तीन बोटे एका मांसाल पडद्याने जोडलेली असतात आणि मागचे बोट क्वचितच दिसते. बगळ्याची बोटे नाजूक, पसरट-रुंद असतात, त्यामुळे भुसभुशीत चिखलात ती रुतत नाहीत. चंडोल आणि कस्तूर या शेतातील पक्ष्यांच्या मागच्या बोटाचे नख खूपच मोठे असते, त्यामुळे ते ताणासारखे उपयोगी पडते. पाकोळीची पुढची बोटे एकमेकांना जोडलेली असतात. सुताराला जोडबोटे असतात. शहामृगासारख्या चरणाऱ्या पक्ष्यांचे पाय भले मोठे असतात. पण त्यांना फक्त दोनच बोटे असतात. लहान पक्षी दहा ते तेरा वर्षेच फक्त जगतात. गरुड वीस वर्षांपर्यंत आणि काही मोठे पक्षी जास्तीत जास्त नव्वद वर्षे जगतात.

पक्ष्यांच्या शरीराचे तपमान १०४ डिग्री फॅ. ते ११० डिग्री फॅ. पर्यंत असते. मनुष्य आणि सस्तन वर्गातील प्राणी यांच्या शरीरातील तपमान, साधारणपणे फक्त ९४·४ फॅ. असते. १०६ फॅ. तपमानाला मनुष्य अगदी हतबल होतो आणि ११० फॅ. तपमान वाढण्यापूर्वीच तो मृत्यू पावतो.



# १०. घरट्यांसाठी पेट्या आणि जेवणाची टेबले

पक्ष्यांसंबंधी इतकी माहिती मिळविल्यानंतर ते आपल्या घराजवळ आणि बागेजवळ असावेत असे तुम्हाला निश्चित वाटू लागेल, याची मला खात्री आहे. यामुळे तुम्ही त्यांचे सहज निरीक्षण करू शकाल आणि त्यांच्याविषयी अधिकाअधिक माहिती मिळवू शकाल. तुम्ही जर पक्ष्यांसाठी अन्न ठेवले आणि त्यांच्या पिल्लांच्या भरणपोषणा-करता त्यांना घरटी करण्यासाठी साध्या पेट्या पुरवल्या तर ते तुमच्याजवळ येतील.

घरटे बांधताना आणि पिल्लांना भरविताना तुम्ही त्यांचे निरीक्षण करू शकता, पण पुतळ्यासारखे स्तब्ध राहण्याची व त्यांच्या अधिक जवळ न जाण्याची खबरदारी घेतलीच पाहिजे. त्यांना जर तेथे राहणे त्रासदायक वाटले तर घरटे सोडून ते जातील आणि दुसरीकडे सुरक्षित ठिकाणी घरटे बांधू लागतील. मग तुम्हांला त्यांचे नीट निरीक्षण करता येणार नाही. जर पिल्ले अंडी फोडून बाहेर आलेली असतील आणि पिल्लांचे आईबाप अन्न आणण्यासाठी बाहेर गेलेले असतील तर त्यांच्या घरट्यात डोकावून पाहायला हरकत नाही. परंतु एखादे पिल्लू उचलून घेण्याचा मात्र चुकूनसुद्धा प्रयत्न करू नका. ती पिल्ले इतकी लहान, नाजूक असतात की जराशा स्पर्शानेही ती जखमी होण्याची शक्यता असते.


तुम्ही तुमच्या बागेत एखादया योग्य ठिकाणी धान्याचे दाणे वगैरे विखरून टाका. तुम्ही तेथे छपून गुपचूप स्वस्थ बसा. लहानशी चिमणी टुणटुण करीत तेथे आलीच पाहिजे. दाणे टिपण्यापूर्वी ती डावीउजवीकडे मान वळवून पाहील. एखादा शत्रू दडून बसलेला नाही ना, याची ती प्रथम खात्री करून घेईल. एखादे वेळी ती न खाताच उडून जाईल. पण अधीर मात्र होऊ नका. (पक्षी-निरीक्षणात

धीर हा फार महत्वाचा भाग आहे) अखेरीस ती चिमण्यांचा तांडाच्या तांडा घेऊन परत येईल. सगळ्या चिवचिवाट करतील आणि दाणे टिपीत बसतील.

तुम्ही तुमच्या हातात नारळ घ्या आणि त्याचे दोन अर्धे अर्धे भाग करा. त्यांना भोके पाडून बळकट दोरीने एकेक भाग झाडावर अथवा खिडकीबाहेर टांगून ठेवा. पक्ष्यांना खोबरे म्हणजे मेजवानीच ! बल्गुली पक्ष्यांना याची आवड विशेष असते.

एखादया दिवशी खाटकाकडून मोठे पण पोकळ असे हाडूक घेऊन या. ते स्वच्छ करा. त्याच्यात थोडी चरवी घाला किंवा कुस्करलेले बटाटे ठेवा. मग येता जाता पाहता येईल अशा ठिकाणी झाडावर ते टांगून ठेवा.

दोन प्रकारची जेवणाची टेबले सुद्धा तुम्हाला तयार करता येतील. एका खांबावर एक आडवा पाट ठोका. हा खांब निदान एक मीटर उंचीचा असावा. म्हणजे मांजर तेथपर्यंत जाणार नाही. हे टेबल एखादया सावलीच्या ठिकाणी उभे करा व त्यावर थोडे खाण्याचे



पदार्थ ठेवा. टेबलाचा दुसरा प्रकार म्हणजे पाटाला चोहोबाजूच्या कोपऱ्यांना भोके पाडून, दोरांनी बांधून तो झाडाच्या फांदीवर टांगता ठेवणे. टेबलांवर पाणी ठेवायला विसरू नका. पाण्याचे भांडे टेबलाशी जखडून टाका, नाही तर सांडून जाईल आणि घोटाळा होईल. पक्षी वारंवार पाणी पितात. विशेषतः उन्हाळ्यात अंगावर शिंतोडे उडविणे, त्यांना फार आवडते.


तुमच्या बागेत जर एखादी जुनीपुराणी वठलेली झाडे असतील तर ती तोडून टाकू नका. अशा झाडांवर तुम्हाला पुष्कळशा नैसर्गिक खाचा आणि खळगे सापडतील. पिल्ले ठेवण्यासाठी त्यांचा उपयोग करून घ्यायला पुष्कळशा पक्ष्यांना आवडते.

वठलेले, जुने झाड जर तुमच्या बागेची शोभा कमी करीत असेल, तर त्याच्याजवळ एखादी नववधूसारखी सुंदर वेल किंवा बोगनवेल लावून टाका. वेलीने झाड झाकून जाईल. अशा रीतीने तुमच्या बागेची शोभा वाढेल आणि पक्षीही जवळ राहतील.

याप्रमाणे तुम्ही घरट्यासाठी पेट्याही तयार कराव्यात. पण त्याआधी पुढील गोष्टी लक्षात घ्या.

पक्ष्यांना घरट्यासाठी आवडणारी जागा, त्यांचा घरटे बांधण्याचा प्रकार आणि त्यासाठी त्यांना लागणारे सामान. भिन्न प्रकारच्या पक्ष्यांची आवड आणि गरज भिन्न भिन्न असते आणि तुमच्या शेजारच्या लहानशा घरात जर काही पक्ष्यांना सोयीचे वाटले नाही तर तुमचे श्रम वाया जातील. पक्षी झाडावरचे व खुंटावरचे कशा प्रकारचे नैसर्गिक खळगे वापरात आणतात हे तुम्ही जर काळजीपूर्वक पाहिले तर तुम्हाला खूपच तऱ्हेचे आकार, प्रकार आणि जागा यांची कल्पना येईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ०८८३८५ वि ...
क्रमांक.....3533 नोंद दि....30.1.3.1 ०७




घरट्यांसाठी पेट्या बनविण्याचे आणि त्या ठेवण्याचे काही साधे नियम असे :—


(अ) पेटीच्या तळापासून बऱ्याच इंच उंचीवर येण्याजाण्यासाठी उघडी जागा असावी.

(ब) जमिनीपासून दहा ते तीस फूट उंच असलेल्या खांबावरच पेटी पक्की बसविलेली असावी. किंवा फांद्याआड झाकून जाणार नाही अशा रीतीने ती झाडालाही घट्ट ठोकून टाकावी.


(क) घरटी बांधण्याचा हंगाम संपला म्हणजे सगळ्या पेट्या खाली काढून पुढच्या हंगामासाठी स्वच्छ करून ठेवाव्यात.

घरट्यांसाठी तयार करावयाच्या पेट्या फार खर्चिक असू नयेत. साध्या प्लायवूडच्या व देवदारी लाकडाच्या, साबणाच्या किंवा इतर सामानांच्या रिकाम्या खोक्यांच्या त्या सहज रीतीने बनविता येतील. सर्व पेट्या तुम्ही स्वतः बनवू शकाल.

आता या पेट्यांसंबंधी अधिक तपशीलवार माहिती पाहू. सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे त्या पाण्याची बाधा न होऊ शकणाऱ्या आणि



वेलीने वेढलेले झाड




टेबलावरील पावाचा चुरा टिपताना

भरपूर हवेशीर असल्याच पाहिजेत. त्या तपकिरी, करडा किंवा मंद हिरवा अशा सौम्य रानवट रंगाने रंगविलेल्या हव्यात.

या पेट्या विविध आकृतीच्या असाव्यात. आणि त्यांचे आकार त्या त्या पक्ष्यांच्या आकारासाठी जमले पाहिजेत. उदाहरणार्थ, मैनेसाठी पेटीचा तळ १५ सेंटीमीटर × १५ सेंटीमीटर आणि उंची ४५ सेंटी-मीटर हवी. आत जाण्याचे भोक तळापासून सुमारे १५ सेंटीमीटर, वर हवे आणि त्याचा व्यास ५ सेंटीमीटर तरी पाहिजे.

चिमणीकरिता ही पेटी १५ सेंटीमीटर उंच आणि सर्व बाजुंनी उघडी हवी. घुबडासाठी पेटीचा तळ २५ सें. मी. × ४५ सें. मी. व उंची ४५ सें. मी. हवी. तसेच तिचे प्रवेशद्वार, तळापासून वर,




घरट्यांसाठी पेट्या

१० सें. मी. आणि व्यास २० सें. मी. हवा. सुतार पक्ष्यासाठी ही पेटी ३८ सें. मी. उंच, प्रवेशद्वार तळापासून ३० सें. मी. वर आणि तिचा व्यास ५ सें. मी. हवा.

ह्या पेटया दिवसा उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून सावलीच्या ठिकाणी ठेवल्या पाहिजेत. परंतु सकाळ-संध्याकाळचा थोडा सूर्य-प्रकाशही आत जाऊ दयावा.

अन्न आणि या पेटया ठेवल्याने तुम्हाला पुष्कळ तऱ्हेचे पक्षी पाहावयास मिळतील, इतकेच नव्हे तर लाजरेबुजरे पक्षीदेखील तुमच्याजवळ येतील. अशा रीतीने, वस्तुतः तुम्ही पक्ष्यांसाठी तुमच्या बागेत, ज्याला सामान्यपणे "आश्रयस्थान" म्हणतात असा आसरा निर्माण करीत असता तेथे त्यांना कसल्याही नुकसानापासून, शिकाऱ्या-पासून, लुटाऱ्यापासून आणि भूक, तहान या सर्वांपासून संरक्षण मिळेल. त्यांचे पालनकर्ते तुम्हीच आहात.



शिलीन्ध्री

## ११. पक्षी-निरीक्षणाविषयी सूचना

पक्षी ओळखण्यासाठी तुम्हाला उत्तम डोळे आणि कान, टिपणवही, पेन्सिल, पक्ष्यांचे सचित्र पुस्तक व सूक्ष्म निरीक्षणाविषयी थोडे शिक्षण यांची आवश्यकता असते. उत्कृष्ट पक्षीनिरीक्षक होण्यासाठी अभ्यासूंनी काही प्रमाणात कोल्हयाचे अनुकरण करावे. पक्ष्यांपर्यंत पोहोचणे सुद्धा माणसांना अवघड होते पण कोल्हे मात्र पक्ष्यांवर ताव मारून उपजीविका करतात. जंगली प्राण्यांना हे कसे जमते? त्यांचा वर्ण संरक्षक असतो. त्यांचे पंजे मऊ, मांसल असतात. आणि त्यांच्या हालचालींचा मुळीच आवाज येत नाही. ते चारी पंजांवर जमिनीशी रांगत आणि शक्य तितके स्वतःला छपवीत असतात. त्यांची

हालचाल अगदी सावकाश चालते. या सगळ्या गोष्टींत आपणाला त्यांचे अनुकरण करण्यात फारशी अडचण येणार नाही.

प्रथमतः काळे, पांढरे आणि उठावदार रंगाचे कपडे टाळा. कारण त्यायोगे पक्षी तुम्हाला चटकन ओळखतील. म्हणून मंद वाळलेल्या पानासारखे किंवा फिकट हिरव्या रंगाचे कपडे वापरा. पक्षी जांभळा रंग ओळखायला असमर्थ असतात म्हणून तुम्ही जांभळाही रंग वापरू शकता. आवाज टाळण्यासाठी रबरी तळव्याचे जोडे वापरा. वाळलेली पाने किंवा पाचोळा यावरून चालू नका. कारण त्यामुळे बराच आवाज होतो आणि पक्षी भिऊन उडून जातात.

त्यानंतर स्वतःला लपता येण्यासारखी झाडे, झुडपे किंवा गवत असलेले ठिकाण निवडा आणि तेथे स्तब्ध बसा. चटकन डोके वळवू नका की हात हलवू नका. असे स्तब्ध बसलात तर पक्षी तुमच्या अगदी नजीक येतील व त्यामुळे त्यांचे तुम्हाला छान निरीक्षण करता येईल. त्यांच्या जवळ जाण्यासाठी तुम्हाला गुडघ्यावर चालावे लागेल अथवा सापाप्रमाणे सरपटावेदेखील लागेल. उघडयावर पक्ष्यांजवळ सरकताना सरळ चालत जाण्याऐवजी वळणावळणाने, वर्तुळाकार किंवा लांबून बाजूबाजूने जाणे चांगले. अशा रीतीनेच तुम्ही त्यांच्याजवळ लवकर जाऊ शकता.

ज्यांना पक्षीनिरीक्षण करावयाचे आहे त्यांनी कोल्ह्यापासून दुसरा एक धडा शिकण्यासारखा आहे. तो म्हणजे एकटेच भटकले पाहिजे. एकटेच. दुसरा कोणी बोलायलाही जवळ नको. मध्ये कसला अडथळाही नको. पक्षीनिरीक्षण करताना तुम्ही निरीक्षणाकडे पूर्ण लक्ष पुरविले पाहिजे. वस्तुतः दीर्घकाल निरीक्षणासाठी फार मोठ्या शारीरिक संयमाची आणि मानसिक एकाग्रतेची गरज असते. परंतु पक्षीनिरीक्षण काही आपल्याला सदैव एकाच जागी खिळवून ठेवीत नाही. पक्ष्यांच्या शोधात मोटार, विमान, जहाज, सायकल, होडी आणि पाय यांचाही उपयोग करावा लागतो. खडक आणि वृक्ष यांवर चढून जावे लागते.

लहानमोठ्या रागीट पक्ष्यांचे चंचुप्रहार आणि नखांचे ओरबाडणेही सहन करावे लागते. थंडी, ऊन वा पाऊस असला तरी तुम्हाला रात्रभर जागेच राहावे लागते. अशा रीतीने पक्षीनिरीक्षण म्हणजे एक सहल, छंद, स्तब्ध करमणूक, अथवा बिकट शास्त्रीय प्रयत्न होऊ शकतो.

वसंत ऋतू आणि उन्हाळयाचा प्रारंभ काळ, पक्षी ओळखण्याची सुरुवात करण्याच्या दृष्टीने अनुकूल असतो. यावेळी ते जागोजागी पाहायला सापडतात. आणि हिवाळी भेट देणाऱ्या पक्ष्यांचीही त्यावेळी मिसळ नसते. पक्ष्यांच्या दिनदर्शिकेत जुलै महिना फारच मनोरंजक असतो, कारण त्यावेळी पुष्कळ पिल्ले आजूबाजूला दिसतात.

सामान्यपणे भल्या पहाटेची आणि संध्याकाळची वेळ पक्षी-निरीक्षणासाठी उत्कृष्ट आहे. कारण यावेळी बहुतेक पक्षी क्रियाशील असतात व गात असतात. वादळी दिवसांत पक्षी फारच भित्रे बनतात आणि दडून बसतात. कारण जरासे पंख पसरताच ते वाऱ्याच्या झोताबरोबर विनासायास वाहून नेले जातात. म्हणून जोरदार वादळी वाऱ्याचे दिवस हे पक्षीनिरीक्षणाला प्रतिकूल असतात. मुसळधार पावसात बहुतेक पक्षी आसरा शोधतात, पण तेच, थोडके आणि उबदार तुषार पडताना ये जा करीत असतात.

पाणकोंबड्यांचा अभ्यास दूर अंतरावरूनच करावा लागतो. अथवा जर तुम्ही तेवढे दक्ष असाल तर हळूच थेट त्यांच्याजवळ जाण्याचा प्रयत्न करू शकता. पक्ष्यांच्या धूर्तपणावर तुमच्या चातुर्याने अशा रीतीने मात केली तर पक्षीनिरीक्षणाची तुमची कळकळ अर्ध्याने सिद्ध झाली असे होईल. परंतु किनाऱ्याजवळील अरुंद झरोक्यातून पाणकोंबड्यांचे उत्तम निरीक्षण करता येते.

पक्षीनिरीक्षक, पक्ष्याला पाहण्यापूर्वी प्रथम त्याच्या स्वराकडे ध्यान देतो. तद्वत पक्ष्याचा प्रत्येक नवखा स्वर ऐकून तुम्ही त्याचा माग

काढीत गेले पाहिजे. काही पक्षी दुसऱ्याच्या आवाजाची नक्कल करतात. पक्षी जेव्हा पानांच्या आड दडून बसतो, तेव्हा त्याचा स्वर प्रथम एका झाडावरून येतो व नंतर तोच स्वर दुसऱ्या झाडावरून येत असल्याचा आपल्याला भास होतो. पुष्कळ पक्षी इतके मृदू स्वरांत गातात की वाटते ते फार लांब आहेत. पण ते असतात मात्र अगदी जवळच !

तुम्ही तुमच्या टिपणवहीत पुढील गोष्टींची माहिती नोंदविली पाहिजे. सर्वांत आधी तारीख लिहा : दिवसाची कुठली वेळ, हवामान आणि वारा, स्थळाचे नाव आणि कुठल्या प्रकारचे स्थळ हे फार महत्त्वाचे मुद्दे आहेत. नंतर पक्ष्यांच्या आकाराची नोंद करा. सेंटीमीटरमध्ये अशी नोंद करणे सुरवातीला कठीण जाईल. परंतु तुम्ही त्यांची तुलना परिचित पक्ष्यांशी नेहमी करू शकता. महत्वाच्या पक्ष्यांच्या आकाराचे हे वर्गीकरण पाहा : चिमणी, बुलबुल, मैना, कावळा आणि घार. टिपणवहीच्या पहिल्या पानावर या महत्वाच्या पक्ष्यांची नावे लिहून ठेवा. हे सगळे पक्षी तुमच्या माहितीचे असलेच पाहिजेत. सर्वसाधारण ठराविक आकारापेक्षा पक्षी लहानमोटा असल्यास अधिक (+), उणे (—) अशा चिन्हांनी त्यांची नोंद करा आणि मग दुसरा धडा गिरवा. चिमणीपेक्षा एखादा पक्षी जर थोडा मोठा असेल तर त्याची नोंद एस (×) अशी करा, अथवा मैनेपेक्षा तो लहान असेल तर एम (—) अशी नोंद करा. या पद्धतीचा वापर तुम्ही जर योग्य प्रकारे आणि वारंवार केलात तर पक्ष्यांचा आकार अजमाविण्याच्या बाबतीत तुम्ही पुष्कळ प्रावीण्य मिळवाल.

नंतर पक्षी एकंदर दिसायला किडकिडीत आहे की जाडजूड आहे ह्याची नोंद करा. पक्षी आपल्या इच्छेनुसार पंख फुगवीत किंवा आकुंचित करीत असतात, तेव्हा शरीराचा अंदाज घेताना तेवढे तारतम्य बाळगले पाहिजे.

नंतर पक्ष्याची चोच मोठी, सरळ, टोकदार बाकदार, पातळ, जाड, पसरट, आकड्यासारखी लहान की निमुळती आहे ह्याची नोंद करा. चोचीचा आकार जर तुम्ही लक्षपूर्वक न्याहाळलात तर त्यावरून तो पक्षी कुठल्या जातीचा आहे, हे तुम्ही ठरवू शकाल. आखूड, निमुळत्या चोचीचा लहान पक्षी जर तुमच्या पाहण्यात आला, तर ती बहुधा चिमणी असेल. जर तो पक्षी चिमणीपेक्षा लहान असेल आणि जर त्याची चोच आखूड, पातळ व किंचितशी बाकदार असेल तर तो बहुधा वटवटया किंवा कीडमुंगी खाणाऱ्या गटातील असणार. चोचीच्या रंगाचादेखील येथे विचार करणे आवश्यक आहे.

नंतर पक्ष्याच्या पायांचा आकार आणि रचना, पक्ष्याचे पाय लांब आहेत की आखूड, हे नीट पाहा. जर ते लांब असतील तर तो दलदलीतून चालणारा पक्षी असणार. त्याचप्रमाणे पंजाची कातडी जर चिकटलेली असेल, तर ते बदकच असणार. पायांचा रंगही पक्षी ओळखण्यास उपयुक्त ठरतो.

शेपटीची लांबी आणि आकारदेखील महत्त्वाचा आहे. शेपटी आखूड, दुभंगलेली, करवतीसारखी, चौकोनी टोकाची, गोलसर टोकदार अथवा अणकुचीदार आहे का, हे पाहा. शेपटी वर केलेली आहे की खाली? तो शेपटी हलवितो का? उदाहरणार्थ, जर तुम्ही मोठया आकाराचा, तपकिरी वर्णाचे ठिपके असलेला आणि आकडेबाज चोच व थोडीशी दुभंगलेली शेपूट असलेला पक्षी पाहिलात तर ती बहुतांशी घार असावी. जर तुम्ही लांब, सरळ, अणकुचीदार, तपकिरी आणि पिवळसर चोच असलेला, आखूड शेपटीचा, लांब पायांचा आणि शुभ्र पिसे असलेला पक्षी पाहिलात तर तो बगळा असू शकतो.

एखादया पक्ष्याला तुरा असेल तर तो कोणत्या रंगाचा आणि आकाराचा आहे हेही न्याहाळून ठेवा.

पक्ष्याच्या शरीराचा वर्ण हा तर फारच महत्वाचा असतो. बहुधा याच मुद्द्याकडे आपले दुर्लक्ष होते. पक्ष्याचा रंग चमकदार व भडक आहे की सौम्यवर्ण आहे हे आणि त्यातही कोणता रंग जास्त ठळकपणे दिसतो आहे हे लक्षात घ्या. नंतर डोके, पाठ पाठीवरचे पंख आणि वरची शेपटी यांच्या पृष्ठभागावरील रंगाची नोंद घ्या. त्यानंतर गळा, छाती, पोट आणि शेपटीची आतील बाजू वगैरे आतील भागावरील रंग टिपा. छाती आणि पोट हा भाग झाकलेला असल्यामुळे यांचा वर्ण बहुधा आहे त्यापेक्षा गर्द दिसतो हे लक्षात घ्या. अशा प्रकारे शुभ्र पांढरा रंगही करडा दिसतो.

कोणता रंग नेमका कुठे आहे, याची नोंद काळजीपूर्वक घ्या. नंतर ठसठशीत दिसणारी खूण (यासाठी छातीवर पाहणे इष्ट) नोंदा. पक्षी साफ (खुणांविरहित) आहे की ठिपक्या ठिपक्यांचा, रेघोटयांचा किंवा पटटयापट्टयांचा आहे? शेपटी टोकाला झुपकेदार, पांढऱ्या टिपक्यांची किंवा पांढऱ्या कडा असलेली आहे का? शेपटीचे टोक ठिगळासारखे आहे का? त्यांच्या पंखांना काडया आहेत की ते साफ आहेत? नाचरा आणि वटवटया यासारख्या लहान वर्गातील पक्ष्यांच्या बाबतीत या काडया असणे आणि नसणे हे फार महत्वाचे आहे. पक्ष्यांच्या डोळयांवर पट्टा आहे, की डोळ्याभोवती वर्तुळ आहे? माथ्यावर पट्टे आहेत की ठिपका आहे?

पाणकोंबड्याचे पंख फार महत्वाचे असतात. ते 'काळ्या टोकांचे' अथवा फिकट 'ठिपक्यांचे' 'चट्टयापट्टयाचे' की दाट रंगाचे आहेत हे लक्षात घ्या. कारण केवळ अशा एकाच खुणे-वरूनसुद्धा पक्ष्याची ओळख पक्की करता येते. तुम्हाला जर रेखाचित्र काढता येत असतील तर फारच चांगले. त्यायोगे पिसारा, पाय, चोच, डोळे यांची बारीकसारीक माहिती आणि शरीराचे प्रमुख अवयव इत्यादी त्याच ठिकाणी रेखाटल्याने पक्षी खूपच माहितीचा होईल.

रानात पक्षी ओळखण्याची उत्तम आणि कधी कधी एकमेव खूण म्हणजे पक्ष्यांचा आवाज. काही पक्ष्यांचे गाणे मधुर असते, काहींचे ओरडणेही कर्कश असते. काहींचा स्वर लकेरीसारखा असतो, तर आणखी असे पुष्कळ प्रकार आढळतात. कोकीळ आणि पांगोळीसारखे दिसणारे पक्षी त्यांच्या केवळ स्वरावरून ओळखता येतात. तुम्ही ऐकलेले सगळे अपरिचित पक्ष्यांचे आवाज त्या पक्ष्याला काय म्हणायचे आहे याची कल्पना करून शब्दांनी वर्णन करायचा प्रयत्न करा. जसे 'च्यू वीट', 'टी–टी', 'का–का', 'ची अर–यू 'ची अर–यू', 'ट्री–ट्री', 'फिक्–फिक फिकर', 'वेट–माय–लिप्स', 'बो–बो–लिंक,' इत्यादी आणि 'संगीतमय', 'धातूसारखा,' 'कर्कश', 'मृदू' अथवा 'कंपित' असे ऐकलेल्या स्वरांचे वर्गीकरण करावे.

नंतर शेवटी, पक्ष्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयी व पद्धती यांचा अभ्यास करा. तसेच पक्षी कोठे दिसला त्या स्थळाची नोंद करा. जसे, दलदलीत, नदीकाठी, बागेत, राईत, जंगलात, शेतात, इत्यादी.

आता पक्षी झाडाच्या फांदीवर आडवा बसतो की फांदीलगत बसतो हे पाहा. पक्षी उघड्या दांडीवर बसत असेल तर कीटकाच्या मागे जाऊन परत येतो का ते पाहा. झाडावर असताना तो कीटका-प्रमाणे नागमोडी वळणाने वर चढतो की सुतार पक्ष्याप्रमाणे शेपटीला ताण देऊन हिसके मारीत चढतो? तसेच शिलीन्ध्री पक्ष्याप्रमाणे आधी डोके खाली करून उतरतो का याची नोंद घ्या.

जमिनीवर असताना चिमणीप्रमाणे त्या पक्ष्याचे पळणे, चालणे व उड्या मारणे असते का? पालापाचोळ्यात तो भक्ष्य धुंडाळतो का? तो झुंडीने प्रवास करतो, एकटा जातो की, जोडीने? हवेत उडताना त्याची झेप वेगवान असते की संथ? पंखांची उघडझाप जलद होते की नाही? तो फेरी मारतो, तरंगतो, उड्डाण घेतो की घिरट्या घालतो हेही पाहा.

पाण्यात असताना त्याला चांगले पोहता येते का? तो सूर मारतो की नुसताच, हळूहळू जाणे किंवा एका बाजूवर कलंडणे वगैरे प्रकार करतो? त्याला स्वतःला सहज रीतीने पाण्याबाहेर येता येते का, की उडण्यापूर्वी पाण्याच्या पृष्ठभागावर फडफड करावी लागते? तो वर खाली घिरट्या घालतो की कबुतराप्रमाणे, तीरासारखी थेट उंच भरारी घेतो? की तो झोकांड्या खात अनियमितपणे फिरत असतो? तो पाकोळ्यासारखा तरंगतो की, ससाण्यासारखा उड्डाण मारतो? बदका-प्रमाणे तो पंखांची उघडझाप भरभर करतो की, बगळ्यासारखी सावकाश? तो आपले पंख समान रीतीने हालवीत जातो की बरीच फडफड करीत? तो एकाच स्थळी घिरट्या घालून खंड्यासारखे पाण्यात आधी डोके बुडवितो का? की तो दलदलीतून जातो? बगळ्यासारखा, लांबसडक पायांवर कसलीही हालचाल न करता वकध्यान करून बराच वेळ दवडणारा तो आहे की तुतवार पक्ष्या-सारखा चिखलाच्या कडेकडेने पळणारा आहे? तो चिखलात चोच खुपसून बसतो की वस्तू उचलून घेतो हे न्याहाळले पाहिजे.

पुढे, जेव्हा तुम्हाला तुमचे पक्षी ओळखता येऊ लागतील तेव्हा तुम्ही त्यांची घरटी आणि अंडी यांचाही परिचय करून घेऊ शकता. पक्ष्यांचे अंडी उबविणे, ती फोडून बाहेर येणे, पंख फुटणे अशा सगळ्या अभ्यासातच मोठी मनोरंजकता आहे. तुमची निरीक्षणशक्ती जसजशी वाढत जाईल, तसतशा कितीतरी मनोरंजक गोष्टी तुम्ही शिकू लागाल. उदाहरणार्थ, तुम्ही तुमचे स्थानिक पक्षी त्यांच्या निवासस्थानानुसार कसे विभागलेले आहेत, त्यांची संख्या, तुमच्या अवतीभवती किती पक्षी घरटी बांधतात, निरनिराळ्या मोसमात आणि निरनिराळ्या स्थळी ते कोणते अन्न खातात, याचा तुम्ही शोध घ्याल. पक्ष्यांच्या रोजच्या सवयी, सजावट व प्रणयाराधन म्हणजे पक्षी निरीक्षकाला चातुर्याचे आकर्षक खेळच वाटतील.

# सूची

तांबट – Barbet
दिव्यक – Bee-eater
बुलबूल – Bulbul

वटवट्या – Chat
कोंबडीचे पिल्लू – Chicken
करढोक पक्षी – Cormorant
सारस – Crane
कावळा – Crow
कोकीळ – Cuckoo
कूरल – Curlew
चष्मेवाला प्लवर – Stone Curlew

कबूतर – Dove
कोतवाल – Drongo
बदक – Duck

गरुड – Eagle

ससाणा – Falcon
नाचरा – Fantail Flycatcher
स्वर्गीय नर्तक – Paradise Flycatcher

हंस – Goose wild
पाणबुडी – Grebe
कुरव – Gull

बहिरी ससाणा – Hawk

बगळा – Heron
बारा धनेश – Large Pied Heron
शिंगचोचा – Hornbill

नीळकंठ – Indian Roller

जलकपोत – Jacana

खंड्या – King fisher
घार – Kite
कोकीळ – Koel

टिटवी – Lapwing
चंडोल – Lark

दयाळ – Magpie Robin
विष्फुलिंग – Minvet
पाणकोंबडी – Moorhen
मैना – Common Myna
सारिका – Hill Myna
अबलख मैना – Pied Myna

मोर – Peacock
फलारोप – Phalarope
भारद्वाज – Pheasant
पारवा – Pegeon
कस्तूर – Pipit
प्लवर – Plover

लावी – Quail
दुर्लाव – Bustard Quail
लहान लावी – Button Quail
डोंगरी लावी – Mountain Quail

गुलाबी मैना – Rosy Pastor

पाकोळी – Sand Martin
तुतवार – Sand Pipe
खाटिक – Shrike
पाणलाव – Snipe
चिमणी – Sparrow
करकोचा – Stork
सूर्यपक्षी – Sun bird
पाकोळी – Swallow
पांगोळी – Swift

शिंपी – Tailor-bird
नदी सुरय – Tern

टिट – Tit

कांचन – Oriole
कैकर – Osprey
शहामृग – Ostrich
घुबड – Owl
पोपट – Parakeet
तितर – Partridge

टकाचोर – Three-pie

गिधाड – Vulture

धोबी – Wagtail
वटवट्या – Warbler
वटवट्या – Sedge Warbler
पाणकोंबडी – Water hen
विणकर – Weaver-bird
तुतिहार – Wood-Cock
सुतार – Wood pecker

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, वाचनालय शाखा.
अनुक्रम ........ वि ........
क्रमांक..३५३३....नोंद दि.........

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९३२६६ नों. दि [redacted]
वि. ........

IRBK-0113266

IRBK-0113266